रायगड, शुक्रवार दि. १ सप्टेंबर २०२३

कृषीवल

किंमत ४ ₹

महाड : दोघांचा बुडून मृत्यू

रायगड : महाड तालुक्यातील मांडले येथे असलेल्या धबधब्यावर पोहण्यासाठी गेलेल्या युवकांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी घडली. रोहित पांडुरंग अवकीरकर (वय १७) व सचिन रामचंद्र अवकीरकर (वय १७) अशी मृत्यू झालेल्या दोन युवकांची नावे आहेत. काही शालेय युवक या मांडले येथे धबधब्यावर पोहण्यासाठी गेलेले होते. पोहताना धबधब्याच्या पाण्यात या दोन तरुणांचा बुडून मृत्यू झाला. दुपारी चारच्या दरम्यान ही घटना घडल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर रेस्क्यू टीम तातडीने त्या ठिकाणी दाखल झाली. दरम्यान या दोन मृत युवकांसह अन्य तीन सहकारी मित्र त्यांच्यासोबत असल्याचे सांगण्यात आले आहे. दोन्ही युवकांचे मृतदेह बाहेर काढले.

पान ८ वर

या भूमीत घडतील उद्याचे विजयवीर

आजचा अग्रलेख

सावलीचे भूत

वेधक

सप्टेंबरमध्ये संसदेचे विशेष अधिवेशन

नवी दिल्ली : केंद्र सरकारने ऐन गणेशोत्सवातच संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. १८ ते २२ सप्टेंबर दरम्यान संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री प्रल्हाद जोशी यांनी ट्विटरवरून दिली आहे. महाराष्ट्रात १९ सप्टेंबरला गणेशोत्सवास प्रारंभ होत आहे. या अधिवेशनात पाच बैठका होणार आहेत. अमृत काल दरम्यान संसदेत महत्त्वाची चर्चा होण्याची अपेक्षा आहे, अशी माहिती प्रल्हाद जोशींनी दिली. दरम्यान, या अधिवेशनात कोणत्या मुद्द्यावरून चर्चा होणार याबाबत माहिती देण्यात आलेली नाही. तसंच, १८ ते २२ सप्टेंबर काळात महाराष्ट्रात गणेशोत्सवाची धामधूम असणार आहे. त्यामुळे अधिवेशनाचा कालावधी बदलावा अशी मागणी खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

धबधब्यात बुडून मामा, भाच्याचा मृत्यू

पनवेल : डोंगराच्या मागील बाजूने धबधब्याच्या जाण्याच्या प्रयत्नात दोघेजण खाली पडल्याची घटना तालुक्यातील आदई येथे घडली असून यात दोघाचा मृत्यू झाला आहे. आदई धबधबाच्या डोंगरावर ३० ऑगस्ट रोजी ७ जण गेले होते. पाठीमागील बाजूने चढून यापैकी २ इसम पाय घसरून पडले. त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. प्रदीप कामी (७) आणि पारस बाकी (३०, दोघेही रा. सुकापुर) असे दोघांची नावे असून ते दोघे मामा भाचे आहेत.

स्थानिक स्वराज संस्था निवडणुका लांबणीवर

नवी दिल्ली : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि ओबीसी आरक्षणाबाबतची सर्वोच्च न्यायालयातील याचिकेची सुनावणी पुन्हा पुढे ढकलली आहे. ही सुनावणी १ सप्टेंबरला होणार होती. मात्र, कामकाजाच्या वेळापत्रकात या याचिकेचा समावेश नसल्याने ही सुनावणी आता नंतर होणार आहे. यामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत.

मुंबई-पुणे द्रुतमार्ग आज दोन तास बंद

मुंबई : मुंबई -पुणे दुतगती महामार्गावर लोणावळा एक्झिट येथे काम असल्याने शुक्रवारी (१ सप्टेंबर) हा मार्ग दुपारी दोन तास रस्ता बंद राहणार आहे. जुलै महिन्यात पुण्याहून मुंबईकडे येणाऱ्या मार्गिकेवर दरड कोसळल्यानं वाहतूक बंद ठेवावी लागली होती. त्यानंतर प्रशासनानं रस्त्यारुन दरड हटवण्यासाठी वाहतूक बंद ठेवली होती. त्यावेळी सुरुवातीला दोन तास वाहतूक बंद ठेवण्यात येईल असं सांगण्यात आलं होतं मात्र वाहतूक पूर्ववत होण्यासाठी अधिक वेळ लागला होता.

अदानी समुहावर नवे आरोप

। मुंबई । प्रतिनिधी ।

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जवळचे उद्योगपती गौतम अदानी यांच्या कंपनीत चीनी व्यक्तीची गुंतवणूक आहे, त्याची संसदेच्या संयुक्त समितीमार्फत चौकशी करावी अशी मागणी काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी केली आहे. अदानी यांच्या कंपनीच्या माध्यमातून १ अब्ज डॉलर्स हे भारताबाहेर गेले आणि नंतर पुन्हा अदानी यांच्या कंपनीत गुंतवण्यात आले असाही आरोप त्यांनी केला. लंडनमधील गार्डियन व फिनान्शियल टाइम्स'मध्ये याबाबत सविस्तर वृत्तांत प्रसिध्द झाले आहेत. त्यांचा हवाला देवून राहुल यांनी अनेक सवाल उपस्थित केले आहे. दरम्यान हे सर्व आरोप अदानी समूहाने फेटाळले आहेत.

अदानी यांच्या कंपनीत काही लोकांनी छुपी गुंतवणूक केली आहे. जवळपास १ अब्ज डॉलर्स हे अदानी यांच्या कंपनीच्या माध्यमातून बाहेर वेगवेगळ्या देशात गेले आणि नंतर ते परत आले. त्या पैशातूनच आता अदानी हे विमानतळ आणि इतर प्रकल्प राबवत आहेत. हा पैसा कुणाचा आहे? अदानींचा आहे की आणखी कुणाचा? दुसऱ्या कुणाचा असेल तर ते कोण आहेत याची चौकशी करावी.

- राहुल गांधी,काँग्रेस नेते

■ मोदींनी खुलासा करावा-राहुल गांधींची मागणी

■ अदानींकडून आरोपांचा इन्कार

विनोद अदानी हे या मागचे मास्टरमाईंड असून ते गौतम अदानी यांचे बंधू आहेत असा आरोप राहुल गांधी यांनी केला. ते म्हणाले की, अदानी यांच्या कंपनीमध्ये नासर अली शाबान अहली आणि चांग चुंग-लिंग यांची गुतंवणूक आहे. अदानी जर भारतात विकास प्रकल्प राबवतात तर त्यांच्या कंपनीमध्ये चीनी व्यक्तीचा पैसा कसा? अदानींची कंपनी ही संरक्षण क्षेत्रात काम करत आहे, मग चीनी व्यक्तीची गुंवतणूक त्यामध्ये कशी काय? गौतम अदानी यांच्या

कंपनीमध्ये दोन व्यक्तींची गुंतवणूक असून ती का आहे याची चौकशी केली पाहिजे. अदानी प्रकरणावर पंतप्रधान नरेंद्र मोदी गप्प का आहेत असा सवाल राहुल गांधी यांनी विचारला. तसेच ईडी, सीबीआय हे अदानी यांची चौकशी का करत नाहीत असा सवालही त्यांनी केला.

'इंडिया'ची आज मुख्य बैठक

इंडिया आघाडीच्या मुंबईत गुरुवारी (३१ सप्टेंबर) सुरु झालेल्या दोन दिवसीय बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीत विरोधकांच्या एकजुटीचा निर्धार करण्यात आला आहे. आघाडीत मतभेद होतील अशी कोणतीही कृती आता केली जाणार नाही. यामुळेच जागावाटपाच्या संवदेनशील मुद्द्याला आताच हात घातला जाणार नाही.असा आशावादा आघाडीतील सर्वच घटक पक्षांनी केला आहे.या बैठकीच्या निमित्ताने महाराष्ट्रात मविआने जोरदार शक्तिप्रदर्शन केले.

इंडिया बैठकीसाठी नेतेमंडळी मुंबईत दाखल झाली आहेत.काँग्रेस नेत्या सोनिया गांधी,राहुल गांधी यांचे दुपारी मुंबईत आगमन झाले. पाटणा आणि बंगळुरूनंतरची तिसरी बैठक यशस्वी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. विरोधकांची एकजूट अधिक भक्कम कशी होईल यावरच अधिक भर दिला जाणार आहे. गुरुवारी इंडिया आघाडीच्या मानचिन्हाचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यानंतर विरोधी नेत्यांची अनौपचारिक चर्चा झाली.. शुक्रवारी दिवसभर आगामी रणनीतीवर खल केला जाणार आहे,असे सुत्रांनी सांगितले.

• (छायाचित्र :समीर मालोदे)

गावागावांमध्ये क्रीडासंकुले हवीत

आ. जयंत पाटील यांचे प्रतिपादन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यामध्ये कबड्डी, क्रिकेट या खेळातून असंख्य खेळाडू तयार झाले आहेत. हा खेळ राज्य, देशपातळीवर पोहचला आहे. शेकापच्या माध्यमातून नागाव, वेश्री या ठिकाणी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स उभारले आहेत. खेळाडूंना ऑलंपिकपर्यंत पोहचण्यासाठी ॲथेलेटिक्स खेळात प्रगती करणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर क्रीडासंकुले होणे काळाची गरज आहे. गावागावातून खेळाडू तयार झाले पाहिजे, असे प्रतिपादन शेकापचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी केले.

आंबेपूर - बांधण या ठिकाणी बॅडमिंटन कोर्ट बांधण्यात आले आहे. या कोर्टचा उद्घाटन सोहळा गुरुवारी (३१ ऑगस्ट) रोजी आ. जयंत पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी ते बोलत होते.

उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना आ. जयंत पाटील म्हणाले, माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांच्यासारखे अनेक मंडळींनी विधीमंडळात आमदार म्हणून अलिबागची शान राखली आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या आमदारांनी विधिमंडळात खारेपाटातील उंची कायम टिकवून ठेवली आहे. आदिवासीवाड्यांपर्यंत काँक्रीट रस्ता झाला पाहिजे. आदीवासी समाजाची गैरसोय होऊ नये यासाठी अधिवेशनात प्रश्न मांडणार आहे. घसवड येथे सुसज्ज असे मासळी बाजारपेठ उभी केली जाणार आहे. पाऊस संपल्यावर त्याचे काम लवकरच सुरु होणार आहे. या बाजारपेठेचा डीपीआर तयार झाला आहे. वडखळ ते अलिबाग हा दुहेरी स्ता लवकरच होणार आहे. डीपी प्लॅन तयार झाला आहे.असे ते म्हणाले.

पांडवादेवी ते पेझारी पर्यंत पूल बांधण्याचा एक प्रयत्न आहे त्याचे नियोजन करण्यात आले आहे ही कामे शेकापच्या माध्यमातून मंजूर केली आहेत. विकास कामे करीत असताना कधी टक्केवारी मागितली नाही. जे बोगस कामे

•➤ पान २ वर

भविष्यात ग्रामपंचायत स्तरावर ॲथेलेटिक्सच्या बाबतीत काम करणार आहे. खेळातून सर्व स्तरातील घटक एकत्र येतात, चर्चा होते. यातूनच विविध प्रकारची कामे केली जाताता. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समुळे गावाचा एकीपणा टिकून राहतो. त्यापध्दतीने गावागावात क्रीडा संकुल उभारून येथील तरुणांना हक्काचे व्यासपिठ होणे गरजेचे आहे. गावाच्या विकासासाठी काम करीत असताना केंद्रबिंद कधीच विसरू नये. तरुणांना इतिहास समजला पाहिजे त्यापध्दतीने कार्यकर्त्यांनी काम करावे

- आ. जयंत पाटील,

खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ : चित्रलेखा पाटील

कला, क्रीडा क्षेत्रात काम करण्याची प्रचंड आवड आहे. शेकापचे नेते आ. जयंत पाटील यांनी शिक्षण, कला, क्षेत्रात काम करण्याची संधी दिली. या क्षेत्रामध्ये काम करीत असताना, क्रीडा क्षेत्रात काहीतरी नवीन करण्याची इच्छा मनात बाळगली. त्यानुसार गेल्या चार वर्षापासून क्रीडा चळवळ सुरु ठेवली. नागावसह वेश्री या ठिकाणी अद्ययावत असे क्रीडा संकुल उभारले. खारेपाटातील खेळाडूंसाठी ओलंपिकच्या धर्तीवर बॅडमिंटन कोर्ट उभारण्याचा निर्णय घेतला. माजी आमदार पंडितशेठ पाटील, शेकापचे जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील यांच्या प्रयत्नाने बांधण याठिकाणी बॅडमिंटन कोर्ट उभे करण्यासाठी जागा मिळाली. सहा महिन्यात कोर्ट उभारण्यात आले आहे. बॅडमिंटन कोर्टच्या माध्यमातून अनेक खेळाडूंना एक व्यासपिठ मिळणार आहे. यातूनच अनेक खेळाडू घडून जिल्हा, राज्य पातळीवर आपल्या खारेपाटाचे नाव वेगळ्या उंचीवर नेतील असा विश्वास आहे. अद्यावत असे सर्व

•➤ पान २ वर

पीएनपी प्रवासी बोटसेवा आजपासून

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दोन महिन्याच्या दीर्घ प्रतिक्षेनंतर पीएनपी प्रवासी बोट सेवा शुक्रवारी १ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या प्रवाशांना आता जलमार्गाने प्रवास करण्याची संधी मिळणार आहे. सकाळी सव्वा आठ ते सायंकाळी सव्वा चार वाजेपर्यंत ही सेवा सुरु राहणार असल्याची माहिती पीएनपी कॅटरमनमार्फत कळविण्यात आले आहे.

पावसाच्या हंगामात वादळामुळे उधाणाचा धोका अधिक असतो. त्यामुळे जून ते ऑगस्ट या दोन महिन्याच्या कालावधीत प्रवासी जलवाहतूक सेवा बंद ठेवली जाते. शासनाच्या सुचनेनुसार गेली दोन महिने पीएनपी प्रवासी बोट सेवा बंद करण्यात आली होती. अखेर या दोन महिन्याच्या प्रतिक्षेनंतर ही सेवा पुर्ववत सुरु करण्यात आली आहे. मांडवा बंदर ते गेट वे ऑफ इंडिया असा जलप्रवास असणार आहे. मुंबईकडे जाणाऱ्या व मुंबईहून अलिबागकडे येणाऱ्या प्रवाशांना अवघ्या ४५ मिनिटात निश्चितस्थळी पोहचता येणार आहे. अन्य जलवाहतूकही शुक्रवारपासून नियमितपणे सुरू होणार आहे.

कथित गोहत्येवरुन तणाव

। महाड । प्रतिनिधी ।

महाड तालुक्यातील राजेवाडी गावामध्ये कथित गोहत्या करुन बेकायदेशीर गोमांस विक्री केली जात असल्याची माहिती गोरक्षकांना मिळाल्यानंतर त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पोलिसांना कारवाई करण्याची मागणी केली. यादरम्यान आरोपी आणि गोरक्षक यांच्यामध्ये बाचाबाची आणि मारहाण झाली. त्यानंतर महाड शहर पोलीस ठाण्यामध्ये गोरक्षक तसेच हिंदुत्ववादी संघटनांनी कारवाई करण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली यामुळे तणाव निर्माण होऊन पोलिसांना लाठीहल्ला करावा लागला.

गोरक्षकांनी आरोपींना मारहाण केली. त्यामुळे आरोपींसह अन्य लोकांनी या गोरक्षकांवर हल्ला चढवला. रिहान रशीद आलेकर, रहमान अब्दुल करीम पालेकर, फरहान अब्दुल करीम पालेकर अशी तीन आरोपांची नावे आहेत. हे वृत्त महाड शहर व

•➤ पान २ वर

पोलिसांकडून लाठीहल्ला

जिल्ह्यात केवळ चार दिवसांचा रक्तसाठा उपलब्ध

। अलिबाग । प्रतिनिधी । वेगवेगळे आजार, शस्त्रक्रिया अशा अनेक कारणांमुळे रक्ताची गरज महत्वाची ठरत आहे. मात्र गेल्या दोन दिवसांपासून अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील रक्तपेढीमध्ये चार दिवस पुरेल इतकाच रक्तसाठा उपलब्ध आहे. रक्ताची मागणी वाढल्याने रक्ताचा जिल्ह्यात तुटवडा निर्माण झाल्याची माहिती समोर येत आहे.

कुणी रक्त देता का रक्त ?

सामाजिक बांधिलकी जपत वेगवेगळ्या धार्मिक, राजकीय, सामाजिकसंस्थांसहमहाविद्यालयातील एनएसएस, एनसीसीचे विद्यार्थी शिबिराच्या माध्यमातून रक्तदाता म्हणून भूमिका बजावतात. त्यामुळे रक्ताची आवश्यकता असणाऱ्यांना रक्तपेढीतून रक्ताचा वेळेवर पुरवठा होतो. रक्तदानामुळे अनेकांचे जीव वाचण्यास मदत होते. वेगवेगळ्या अपघातांमुळे जखमी तसेच गरोदर महिलांना शस्त्रक्रियेच्या

•➤ पान २ वर

सध्या रक्ताचा पुरवठा कमी आहे. सध्या चार दिवस पुरेल इतका रक्ताचा साठा उपलब्ध आहे. नियमित रक्तदान केल्याने रक्तपेढीमध्ये मुबलक प्रमाणात रक्ताचा पुरवठा होणार आहे. यातून अनेकांचे जीव वाचण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त संस्था, संघटनांनी रक्तदान शिबिरे राबवून सहकार्य करावे.

- डॉ. दीपक गोसावी
रक्त संक्रमण अधिकारी

रक्तपुरवठ्यावर दृष्टीक्षेप

गट	संख्या
ए पॉझिटीव्ह	५१
बी. पॉझिटीव्ह	१०
ओ. पॉझिटीव्ह	२०
ए व बी पॉझिटीव्ह	१२
एकूण	९३



ग्रामीण भागात क्रीडासंकुले हवीत

करीत आहेत त्यांना वठणीवर आणण्याचे काम केले जाणार आहे. राज्याच्या बजेटपेक्षा अधिक कामे केली जात आहेत. निवडणूका समोर ठेवून जनतेची दिशाभूल करण्याचे काम काही मंडळी करीत आहेत. हे धोरण चुकीचे आहे. आगामी अर्थसंकल्पात याबाबत आवाज उठवून सरकारच्या ही बाबत निदर्शनास आणून देणार. विधीमंडळात चांगले लोकप्रतिनिधी बसले पाहिजेत. त्यासाठी प्रत्येक कार्यकर्त्याने आतापासून कामाला लागा. पुढे जयंत पाटील यांनी सांगितले. चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने बांधण याठिकाणी चांगले बॅडमिंटन कोर्ट बांधले आहे. त्याची देखभाल दुरुस्ती योग्य पध्दतीने होणे आवश्यक आहे. त्याठिकाणी सुविधा उपलब्ध करून खेळाडूंना घडविण्याचे काम केले पाहिजे.असे ते म्हणाले. या प्रसंगी पंचक्रोशीतील अनेक राष्ट्रीय खेळाडूंचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

अनेक मान्यवरांची उपस्थिती

माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, माजी आ. पंडित पाटील, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, रायगड जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, शेकाप अलिबाग तालुका चिटणीस अनिल पाटील, संदीप घरत, आंबेपूरच्या सरपंच सुमन पाटील, युवा नेते सवाई पाटील, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद ठाकूर, प्रमोद राऊत, प्रकाश जैन, बाळू पाटील, अलिबाग नगरपरिषदेच्या माजी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे, संजना कीर, शेकाप महिला आघाडी तालुका प्रमुख प्रिती पाटील, माजी सभापती विद्या म्हात्रे, माजी उपसभापती प्रकाश पाटील, कुंदा गावंड, अनिल चोपडा, शरद वरसोलकर, राजेंद्र म्हात्रे, सुरेश खोत, नंदकुमार मयेकर, दिपक पाटील, संदीप पाटील, नितीन पालकर, सोहम वागळे, ॲड. मनोज धुमाळ, जगदीश पाटील, कौस्तूभ पाटील, अशोक खोत आदी मान्यवरांसह विविध क्षेत्रातील मंडळी, शेकाप कार्यकर्ते, ग्रामस्थ, खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाडमध्ये गोहत्येवरुन तणाव

आजूबाजूच्या परिसरात वाऱ्यासारखे पसरताच महाड शहर पोलीस ठाण्यात गर्दी जमण्यास सुरुवात झाली. पोलिसांनी जमलेल्या कार्यकर्त्यांना कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी शांततेच्या आवाहन केले मात्र पोलीस जोपर्यंत गुन्हा दाखल करत नाहीत तोपर्यंत आम्ही इथून हलणार नाही अशी भूमिका घेतल्याने अखेर महाड शहर पोलिसांनी जमलेल्या जमावावर लाठी हल्ला केला त्यामुळे शांततेत जमलेला जमाव अखेर संतप्त झाला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे युवा सेना दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष चेतन पोटफोडे व महाराष्ट्र वाहतूक सेनेचे जिल्हाध्यक्ष सुभाष मोरे यांनी याबाबत कठोर भूमिका घेतल्याने ते आजच्या या गोवंश हत्या प्रकरणात हिंदू रक्षक समितीच्या कार्यकर्त्यांसोबत असल्याने तो राग मनात धरून महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांनी जाणीवपूर्वक या दोघांना दंगल सदृश्य परिस्थिती घडवण्यास कारणीभूत ठरल्याचा गुन्हा त्या दोघांवर दाखल केला आहे. या प्रकरणांमध्ये परस्परविरोधी गुन्हे दाखल होणार आहेत. ज्या व्यक्तींच्या विरोधामध्ये गुन्हा दाखल होत आहे त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांकडून मारहाणीचा तर गोरक्षक देखील मारहाणीची परस्पर विरोधी तक्रार दाखल केली जात आहे. तसेच पोलीस ठाण्याबाहेर जमलेल्या गर्दीतून पोलिसांवर धावून गेल्याप्रकरणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या दोन कार्यकर्त्यांवर महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होत आहे.

याप्रकरणी नागरिकांनी शांतता राखली पाहिजे. समाज माध्यमावर येणाऱ्या कोणत्याही संदेशावर विश्वास न ठेवता शांतता राखण्याची आव्हान देखील पोलिसांनी केले आहे. अशा प्रकारच्या संदेशातून जातीय तणाव आणि वाद निर्माण होण्याची शक्यता आहे या पार्श्वभूमीवर पोलिसांनी देखील पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ : चित्रलेखा पाटील

सोयी सुविधांयुक्त असे हे कोर्ट आहे. त्याचा फायदा या परिसरातील खेळाडूंना होईल. असा विश्वास शेकापच्या महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी प्रस्तावना करताना व्यक्त केला.

कुणी रक्त देता का रक्त?

दरम्यान तसेच वेगवेगळ्या आजारातील रुग्णांना रक्तांची गरज भेडसावत आहे. त्यामुळे रक्तांचे संकलन करून ठेवणे आवश्यक आहे.

अनुवंशिक आजार असलेल्या रुग्णांसह अपघातग्रस्त, प्रसुतीसाठी आलेल्या महिला, शस्त्रक्रीयेसाठी रक्ताची मोठ्या प्रमाणात मागणी असते. अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या आवारात स्वतंत्र असे रक्त संकलन विभाग आहे. या विभागामार्फत गरजूंना रक्त पुरवठा केला जातो. रुग्णालयातील रक्त पेढी विभागाला दर आठवड्याला रक्ताच्या १५० पिशव्यांची गरज असते. दिवसाला २५ रक्ताच्या पिशव्या लागतात. परंतु रुग्ण संख्या वाढल्याने रक्ताची गरज मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. त्यात बी. व ओ गटाच्या रक्ताचा तुटवडा फारच कमी असल्याची माहिती रक्त संकलन विभागाकडून देण्यात आली आहे.

संकलनासाठी आवाहन

रायगड जिल्हयात रक्ताचा तुटवडा जाणवू लागल्याने रक्त संकलन विभागाकडून रक्तदानासाठी आवाहन करण्यात आले आहे. रविवार तीन सप्टेंबर रोजी रोहामधील खारी, भरडखोलमध्ये रविवारी आठ सप्टेंबर, गोवे येथील तटकरे कॉलेजमध्ये बुधवारी नऊ सप्टेंबर, पेण येथे गुरुवारी दहा सप्टेंबर तसेच गणेशोत्सव मंडळाच्यावतीने २० ते २४ सप्टेंबर या कालावधीत गोंडेघर, बोर्ली पंचतन, चणेरा, भुनेश्वर या ठिकाणी वेगवेगळ्या संथा संघटनाच्यावतीने रक्तदान शिबीर घेतले जाणार आहे. जिल्हयातील नागरिकांनी या रक्तदान शिबीरात सहभाग घेऊन रक्तदान करावे असे आवाहन केले जात आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

नाना पाटील यांची जयंती उत्साहात

। मुंबई । प्रतिनिधी ।

वडाळा येथील गणेश नगरमध्ये आगरी समाजाचे महान नेते कुळ कायद्याचे जनक नारायण नागू पाटील यांची १३३ वी जयंती मोठ्या थाटाने साजरी करण्यात आली. दिनांक २९ ऑगस्ट मंगळवारी जयंती सोहळ्यानिमित्त नारायण नागू पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. आगरी समाजाचे, संघटनेचे कार्यकारी अध्यक्ष रमेश भोईर यांच्या पुढाकाराने व आगरी समाजाच्या विविध नेते व कार्यकर्ते यांच्या सहकार्याने कार्यक्रम मोठ्या थाटात पार पडला. यावेळी बबन पाटील, भिकाजी महाडिक, प्रमोद गावंड,दिगंबर घरत, त्रिभुवन महागे, प्रकाश महाडिक, विजय शिवदार तसेच ओबीसी हितचिंतक शंकर लोखंडे, कृष्णाजी दासरी व मूलनिवासी मालाजी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ रायगड विभाग पेण.
निविदा सूचना क्र. ०७/२०२३-२०२४

विभाग नियंत्रक, म. रा. मा. प. महामंडळ रायगड विभाग पेण हे रायगड विभागातील रामवाडी बसस्थानकावर अस्तित्वातील प्रसाधन गृहाची किरकोळ दुरुस्ती करणे व दैनदिन देखभाल करणे या तत्वावर चालविण्यास देणे बाबत नोंदणीकृत व अनुभवी सेवाभावी संस्था यांचे कडुन मोहोरबंद निविदा मागविण्यांत येत आहेत.

कराराच्या अटी व शर्ती व इतर माहीती स्थापत्य शाखा विभागीय कार्यालय म.रा.मा.प. महामंडळ, रामवाडी, पेण जि रायगड पेण येथे कार्यालयीन वेळेत पाहवयास मिळतील.

१) प्रत्येक निविदा संचाची किमंत रु ५९०/- जीएसटी सह आहे.
२) कोरे निविदा संच मिळण्याचा कालावधी दिनांक ०१.०९.२०२३ ते ०८.०९.२०२३ सोमवार ते शुक्रवार सकाळी ११.०० ते १.३० व शनिवार सकाळी ०९.३० ते ११.३० वाजेपर्यंत (कार्यालयीन सुट्टी वगळून)
३) निविदा उघडण्यांचा दिनांक ०८.०९.२०२३. रोजी वेळ. १६.३० वाजता (शक्य झाल्यास)
४) अनामत रक्कम रु १००००/- दिनांक ०८.०९.२०२३ पर्यंत स्विकारली जाईल (१३.३० वाजेपर्यंत)
५) कोणतेही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महामंडळाने आपल्याकडे राखुन ठेवला आहे.
६) निविदा स्विकारणेची अतिंम तारीख ही ०८.०९.२०२३ (१५.०० वाजेपर्यंत)

विभाग नियंत्रक
रा.प. रायगड विभाग पेण

जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या शेतजमिन मिळकती श्री. निळकंठ यशवंत तेंडूलकर, श्री. शशिकांत यशवंत तेंडूलकर, श्री. उदयकुमार यशवंत तेंडूलकर राहणार झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहे. सदरील शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. निळकंठ यशवंत तेंडूलकर, श्री. शशिकांत यशवंत तेंडूलकर, श्री. उदयकुमार यशवंत तेंडूलकर, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तहेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तहेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु.पैसे)
झिराड ता. अलिबाग	२३१	०-६१-८० पो.ख. ०-०७-०० **एकूण ०-६८-८०**	१७-२०
झिराड ता. अलिबाग	३१४	०-१६-०० ०-०२-०० **एकूण ०-१८-००**	००-३०

अलिबाग,
दिनांक : १/०९/२०२३.

सही/
(ॲड. संजय म. भगत)
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

Panvel Municipal Corporation
Tal.panvel,Dist. Raigad, Pin No.410206
office No: 022-27458040, 41-42 Fax No: 022-27452233
E-Mail: panvelcorporation@gmail.com Website-www.panvelcorporation.com
Office O.W.No.PMC/W.S./639/2023 **Date. 29/08/2023**

जाहीर निविदा दरपत्रक

आयुक्त, पनवेल महानगरपालिकेत Web based water billing system पुरविणे आणि कार्यान्वित करणे, या कामाचे अंदाजपत्रक बनविण्याकरीता खाली नमूद केलेल्या बाबींकरीता खालील नमूण्यात दर मागविण्यात येत आहेत.

अ.क्र	कामाचे नाव	मुदत
१	पनवेल महानगरपालिकेत Web based water billing system पुरविणे आणि कार्यान्वित करणे	०१/०९/२०२३ ते ०८/०९/२०२३(७ दिवस)

Specitication

Sr. No	DESCRIPTION	Qty	Unit
1	Item No.1 :- Billing Software	1	No
	Meter reading & Validation, Billing Process, Bill Printing, Bill Adjustment, New Service Connection, Attribute Change, Complaints, Customer information System, Meter Management System, Service Disconnection/ Reconnection process, Management Information System, Graphical Dashboard for Management, Mobile Application for Meter Reader, Mobile Application for Consumers, Grievance Management & Tracking, Tanker Management.		
2	Item No. 2 :- Customization & Implementation	1	No
	Workflow Process- Customization for CRM, Process Customization Billing SMS Integration, payment Gateway integration, New Connection forms, Customized Bill format, Handholding till 3 billing cycle, Training to End users installing software		
3	Item No. 3 :- Annual maintenance of Billing Software w.r.t. Item no.1 from second year to 6 years. (specify details of software maintenance)	1	No

१) सीलबंद निविदा दि.०८/०९/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्वीकारण्यात येतील.
२) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.०८/०९/२०२३ रोजी दुपारी ३.३० (शक्यतो) वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
३) अटी व शर्ती युक्त निविदांचा विचार केला जाणार नाही.
प्राप्त निविदेतील १ अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

सही/-
शहर अभियंता
पनवेल महानगरपालिका

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वंजारवाडी, ता.कर्जत जि.रायगड, येथील खालील प्रमाणे हक्क नोंदीस वर्णन असलेल्या शेतजमिन मिळकती आमचे अशिलांनी संबंधीत मालक/कब्जेदार यांचेकडून पूर्ण मालकी हक्काने कायम खरेदी घेणेचे निश्चित केल्या आहेत.

अ. क्र.	कब्जेदारांची नावे	सर्व्हे/हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे.आर.पॉ.	आकार रू.पै.
१.	प्रिया राकेश जोशी रिंकु रमेश पिपलावा	३१/२/ब/१	०-३८-०० ०-०२-०० ०-४०-००	०-२४
२	रिंकु रमेश पिपलावा प्रिया राकेश जोशी	३१/२/ब/२	०-३७-०० ०-०१-०० ०-३८-००	०-२३

सबब सदर मिळकतीवर अगर त्यांचा कोणताही भाग, अंश अगर हिश्यावर कोणाचाही गहाण,दान, बक्षीस, फरोक्त, पोटगी संपादन भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदिल, ट्रस्ट, वारसा, अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास संबंधितानी हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसाच्या मुदतीत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखी पुराव्या सहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात याप्रमाणे कोणाचीही कसलेही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकती निर्वेध, बोजारहित व हस्तांतरीत करून घेण्यास योग्य आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितानी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजणेत येईल.

ठिकाण : मोर्बे
दिनांक : ०१/०९/२०२३

सौ.प्रियंका प्र.मिरकुटे
ॲडव्होकेट
रा.मोर्बे, ता.खालापूर, जि.रायगड
मो. ८३६९५६४६००

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नांदाईपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
नांदाईपाडा ता. अलिबाग	३०४/२/१	जिरायत ०-३४-०० वरकस ०-१६-५० पो.ख. क्षेत्र ०-०५-५० एकूण क्षेत्र ०-५६-००	७.१५

वर वर्णन जमीन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक हरीश साहेबसिंघ अडवानी यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पूर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहीत लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ३१/०८/२०२३
मोबा नं. ९९२२७०७०१२

ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे
मु. बुरूमखाण, पो. वरसोली
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकती त्या मिळकतींचे विद्यमान मालक श्री.विनय केशव पंडित रा.नारंगी अलिबाग यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. व सदरच्या मिळकती या निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमच्या अशिलांस विद्यमान मालकाने दिलेला आहे. सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत शोध घेण्याकरीता व त्या मिळकतीच्या विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करण्याकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमच्याकडे दिले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र हे.आर(आर.चौ.मी)	आकार (रू.पै.)	विद्यमान मालक
नारंगी अलिबाग	४३/२अ	एकूण क्षेत्र ०.०६.१०	००.१२	श्री.विनय केशव पंडित रा.अलिबाग
नारंगी अलिबाग	४३/२ब	एकूण क्षेत्र ०.०८.१०	००.१७	श्री.विनय केशव पंडित रा.अलिबाग

सदरहू मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतींचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतींत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी स्वरूपात खाली सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात.

येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न असल्यास सदरच्या मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

कळावे,
अलिबाग
तारीख : ३१/०८/२०२३

(ॲड.सागर विजय पाटील)
पत्ता-मु.घर नं.१६०६,
लालबाग, ब्राम्हण आळी,
ता.अलिबाग जि.रायगड
मो.नं. ९९२२५६७८९१

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक श्री.गणेश बेंचरा पटेल (चौधरी) व इतर ३ यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशीलवार वर्णन पुढीलप्रमाणेः-

मौजे-लाडीवली तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील

सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर	एकुण क्षेत्र(हे.आ.पॉ.)	आकार(रू.पै.)
२/२	एकूण क्षेत्र ०-७७-३० या क्षेत्रापैकी वरील मालक यांचे हिश्याचे क्षेत्र ०-१८-०० हे आर पॉ एवढे	१३-१९

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०१/०९/२०२३
मोबा.९८२२६९११०९

ॲड.निलेश कान्हु मोरे
ऑफिस पत्ता-शॉप नं.२९, तळमजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर, अमराई रोड,
कर्जत ता.कर्जत जि.रायगड ४१०२०१

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णनाच्या मिळकती, मिळकतींचे मालक १)रेश्मा रमेश म्हात्रे व २) श्री.विनीत रमेश म्हात्रे यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरवले आहे.

अ. मिळकतीचे वर्णन (बिनशेती)

मौजे	गट नं	क्षेत्र(हे.आर.)	आकार (रू.पै.)
चौल, ता.अलिबाग, जि.रायगड	२४१२	०-०५-३०	०.५३

ब. घर मिळकत

मौजे	ग्रामपंचायत	घर नं.	क्षेत्र(चौ.फूट.)	घरपट्टी (रू.पै.)
चौल, ता.अलिबाग जि.रायगड	चौल	१०३७	१६३८ चौ.फूट	८९६

सदरहू मिळकतींवर कुणाचाही गहाण, दान, लिज, विक्रीचा करार, पोटगी, चार्ज, बक्षीस, वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळ हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४(चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे कागदपत्रे पुराव्यासही लेखी कळवावे. तशी कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, मुदतीत आमच्याकडे न आल्यास वरील मिळकतींवर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे व सदर मिळकती या निर्वेध, बोजारहीत आहेत असे गृहित धरून सदरहू मिळकतीसंबंधी आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार करतील. मुदतीचे बाहेर आलेल्या कुणाच्याही, कोणत्याही प्रकारच्या हरकती/तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : ३१/०८/२०२३

ॲड.सुनिल के.वाकडे
डी-१,तळमजला, हिराबाग को.ऑप.हौ.सोसायटी,
सगुण हॉटेल शेजारी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा नं.९८६७७१५५२४

जाहीर नोटीस

माझे आशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणेः-

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र(हे.आर.)	आकार रू.पै.
नांदगांव ता.मुरूड जि.रायगड	६९२/१	०.५८.००	१०.०९

व त्यामधील ग्रुप ग्रामपंचायत नांदगाव, ता.मुरूड, जि.रायगड कडील मालमत्ता ७९३ या मिळकतीबाबत व सदरहु मिळकतीत ये-जा करण्याकरीता गट नं.६८८, एकूण क्षेत्र ०.१३.५० हे.आर.या मिळकतीतून २० फुट X १०९ फुट (एकूण क्षेत्र २ गुंठे) इतके क्षेत्र कायमस्वरूपी वहिवाटीच्या रस्त्याकरीता

वर वर्णन केलेली सदरहु मिळकती ही आज रोजी श्री.मिहीर चंद्रकांत घेलानी रा.मुंबई यांच्या नावे ७/१२ दप्तरी नोंदलेली असून विद्यमान मालक यांनी ये-जा करण्याच्या वहिवाटीच्या रस्त्याच्या हक्कासहित माझे आशिलांस विकत देण्याबाबत बोलणी केलेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझ्या आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क, कुळहक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचाही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून माझे आशिल विद्यमान मालकांबरोबर पुढील खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०१/०९/२०२३

(ॲड.परेश एम.घरत)
तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर,
एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड, खरेदीदारांचे वकील
९८५०४८१२३४

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे.कडाव, ता.कर्जत, जि.रायगड. येथील खालील वर्णनाची भातशेती/रापड सातबारा मिळकत आमचे अशिल यांनी खालील नमूद विद्यमान मालक यांच्याकडून खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मौजे-कडाव, ता.कर्जत जि.रायगड येथील मिळकत

मालकाचे नाव	स.नं./हिस्सा नं.	क्षेत्रः हे.आर.प्रति	आकार
चेतना उमेश साळुंके व ५	११/१	०-९७-०० पोट ख.०-०३-०० एकूण १-००-००	४.३४
चेतना

क्षणचित्रे

भेंडखळमध्ये सप्ताह

उरण : भेंडखळ गावामध्ये सप्ताहाची परंपरा आजही कायम आहे. श्रावण शुक्ल प्रतिपदा ते गोपाळ काळा या दिवसात १५५ वर्षा पूर्वी सुरू केलेली परंपरा येणार्या पिढीने राखून ठेवली. यावर्षी दिनांक ३१ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या दिवसात हा सोहळा संपन्न होत आहे.यानिमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित केलेले आहे.गावातील सर्वजण यामध्ये उत्साहाने सहभागी झालेले आहेत.मान्यवरांचे कीर्तन होणार आहे.

राखी उत्सव साजरा

बोर्लीपंचतन : सकल मराठा परिवाराच्या माध्यमातून श्रीवर्धन पोलीस स्टेशन येथे रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला. रूपा सुखदरे, भाग्यश्री शिवण क्लास व शिवकन्या ग्रुप महिलांनी पोलीस उपविभागीय अधिकारी श्री. स्वामी आणि पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांना राख्या बांधण्यात आल्या. श्रीवर्धन पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी आपुलकीने राखी बांधालयाबद्दल महिला वर्गाचे मनपूर्वक आभार मानले.

पालीत दहीहंडी महोत्सव

पाली/बेणसे: बाळासाहेबांची शिवसेना पक्ष , सुधागड तालुका आयोजीत पालीत भव्य दहीहंडी महोत्सव साजरा होत आहे.यासाठी ार आहे. प्रथम क्रमांकास १ लाख ११ हजार १११ रुपयांचे पारितोषिक लावण्यात आले आहे. तसेच प्रत्येकी ६ थरांच्या सलामिस ५ हजार रूपये व इतर आकर्षक बक्षिसे देखील लावण्यात आली आहेत. तसेच दहीहंडी महोत्सवा दरम्यान नृत्याविष्कार देखील सादर होणार आहे.

विजेच्या धक्क्याने मृत्यू

रसायनी: रिस येथे विद्युत धक्का लागून तरूणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. करण कुमार (वय १८,बिहार) हा दुकानाच्या बाजूला अंधारात लघवी करण्यासाठी गेला असता तेथे विजेचा धक्का लागल्याने बेशुध्द झाला. त्यास तात्काळ ग्रामीण रूग्णालय चौक येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले.याबाबत आकस्मिक मृत्यू अशी नोंद करण्यात आली आहे.रसायन पोलीस पुढील तपास करत आहेत.

मृतदेहाची ओळख पटली

माणगांव गारळ गावचे हद्दीत रेल्वे ट्रॅकवर सापडलेला मृतदेह हा अजिता संदीप दसवते वय वर्ष २३ रा. गारळ ता. माणगांव. हिचा असून पोलिसांच्या तपासात तो निष्पन्न झाला. अजिता ही मुंबई येथे कामाला होती. ती मागील २ दिवसांपूर्वी आपल्या मूळगावी गारळ या ठिकाणी आल्याची माहिती समोर आली आहे. याप्रकरणी माणगांव पोलीस ठाण्यात प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. व मृतदेहाची ओळख पटली असल्याने तो ताब्यात देण्यात आला आहे.

सावधान पनवेलकरांनो

■ डेंग्यू, मलेरिया फैलावतोय; ऑगस्ट महिन्यात रुग्ण संख्या वाढली, पालिका प्रशासन सज्ज

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

सावधान, पनवेलकरांनो,शहरात डेंग्यू,मलेरियाचा फैलाव वाढतोय, ऑगस्ट महिन्यात रुग्ण संख्येत वाढ झाल्याने पालिका प्रशासनही सज्ज झालेले आहे.नागरिकांनीही योग्य ती काळजी घ्यावी,असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केलेले आहे.

पनवेल पालिका हद्दीत डेंग्यू आणि मलेरियाच्या रुग्णसंख्येत वाढ होताना दिसून येत आहे. जुलै आणि ऑगस्ट महिण्यात डेंग्यू च्या २४१ रुग्णांची नोंद झाली असून,मलेरियाच्या ६७ रुग्णांची नोंद करण्यात आली आहे. पावसाळ्यात वातावरणात होत असलेल्या बदला मुळे साथीचे आजार बळवण्याची शक्यता असते. अशा वेळी साथीच्या आजाराची लागण होऊ नये या करता काळजी घेणे गरजेचे असते. पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाकडून देखील या करता विशेष मोहीम राबवली जात असून, साथीचे आजार पसरवण्यास जवाबदार डासांची पैदास रोखण्यासाठी वेळोवेळी धूर फवारणी करत नागरिकांमध्ये मध्ये जनजागृती केली जात आहे. वैद्यकीय आरोग्य विभागाकडून देण्यात आलेल्या माहिती नुसार जुलै महिण्यात पालिका हद्दीत डेंग्युच्या ११५ रुग्णांची नोंद झाली आहे. या पैकी १०८ रुग्ण खाजगी रुग्णालयात आढळून आले आहेत.तर पालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात ७ रुग्णांची नोंद झाली आहे.ऑगस्ट महिन्यात डेंग्यू च्या रुग्णसंख्येत वाढ झाली असून खाजगी रुग्णालयात १०३ तर पालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात २३ अशा १२६ रुग्णांची नोंद करण्यात आली असल्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

१) साथीचा फैलाव

ऑगस्ट महिन्यात मलेरियाच्या रुग्ण संख्येत देखील वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. जुलै महिन्यात मलेरियाच्या २५ रुग्णांनची नोंद झाली होती तर ऑगस्ट महिन्यात यात वाढ होऊन रुग्ण संख्या ४२ वर गेली आहे.

२) प्रशासनाने कंबर कसली

साथ रोग नियंत्रणासाठी पालिकेचे वैद्यकीय आरोग्य विभाग सज्ज असून १० प्रथमिक आरोग्य केंद्रा अंतर्गत ९५ कर्मचाऱ्यांच्या टीम सोबत ८ एमपीडब्ल्यू ४ एचआईटी ची टीम नागरिकांमध्ये साथ रोग नियंत्रणसाठी जनजागृती तसेच चाचण्या करण्याचे काम करत आहे.

३) २५ हजार चाचण्या

जानेवारी ते ऑगस्ट महिन्या दरम्यान पालिकेच्या माध्यमातून २५ हजार ९८९ मलेरियाच्या चाचण्या करण्यात आल्या ज्या मध्ये ६७ रुग्ण पॉसिटीव्ह आले तर डेंग्यू च्या १४९ चाचण्यामध्ये ३४ रुग्ण पॉझिटीव्ह आले आहेत.

> साथ रोग नियंत्रणासाठी पालिका प्रशासन सर्वोतोपरी सज्ज आहे. आरोग्य यंत्रणेत मोठ्या प्रमाणात आरोग्य कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आल्याने त्याचा फायदा देखील होत आहे.
> - सचिन पवार, उपायुक्त. पनवेल.

> नगरसेवकांचा कार्यकाळ संपल्यामुळे सध्या महापालिकेमध्ये प्रशासन सर्व यंत्रणा सांभाळते.अशा परिस्थितीत नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने बऱ्याच ठिकाणी उणीव जाणवते. त्यामुळे भविष्यात होणाऱ्या त्रासाबद्दल आपण अगोदरच नियोजन केले तर नक्कीच पनवेल मध्ये डेंग्यूचे रुग्ण वाढणार नाही. आयुक्तांनी यासंदर्भात योग्य ती पावले उचलावी अशा प्रकारे मी मागणी केली आहे आणि पाठपुरावाही करत आहे.:-
> प्रितम जनार्दन म्हात्रे
> (मा. विरोधी पक्षनेता, प. म. पा.)

माणगावमध्ये चांद्रयानाची प्रतिकृती

विद्यार्थ्यांच्या कलाकृतींनी पालक भारावले

। माणगाव । प्रतिनिधी ।

मुगवली येथील प्रख्यात लीड स्कूल शाळेने दरवर्षी प्रमाणे यंदाचे वर्षीही आपली स्टुडंट्स लीड कॉन्फरन्स नुकतीच आयोजित केली होती. यावेळी अखंड भारताचे नव्हे तर संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतलेल्या चंद्र यान - ३ ची प्रतिकृती लीडस्कूलच्या विद्यार्थ्यांनी कागद पुठ्ठ्यां पासून तयार केलेली साकारली एवढेच नव्हे तर त्याची चाचणी ही करून दाखवली. विद्यार्थ्यांच्या या नाविन्यपूर्ण प्रतिकृतीचे उपस्थित पालक, शिक्षक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले असून अभिमानाने त्यांच्या भुवया आता उंचावल्या आहेत.

नुकतीच भारताची चांद्रयान मोहीम यशस्वी झाली. हा क्षण प्रत्येक भारतीयाने साजरा करायलाच हवा हे लक्षात घेऊन शाळेच्या इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांनी मिळून चंद्रयान ३ ची मोठी अशी चलचित्र स्वरूपात प्रतिकृती बनवून आपल्या देशाच्या या महान कार्याला आणि देशातील महान शास्त्रज्ञाना मानवंदना दिली. ही चांद्रयान ३ ची प्रतिकृती बनवायला ८ ते १० दिवस लागले. सदर प्रतिकृती कागदी पुठ्ठ्यांपासून बनविण्यात आली आणि स्टुडंट्स लीड कॉन्फरन्सच्या दिवशी प्रदर्शित करण्यात आली. शाळेमध्ये आलेल्या सर्व मान्यवरांनी शाळेचे उपाध्यक्ष पालक वर्ग विद्यार्थी या सर्वांनी कौतुक केले. येणाऱ्या सर्वांना चंद्रयान -३ बद्दल सखोल माहिती देत विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वज हातात घेऊन देशाच्या या कार्याला सलाम केला.

जयंत वाडेकर यांचे निधन

। पेडणे । प्रतिनिधी ।

गोवामुक्ती आंदोलनात तेरेखोल किल्ल्यावर शहीद झालेल्या हुतात्मा शेषनाथ वाडेकर यांचे सुपुत्र जयंत शेषनाथ वाडेकर (६८) यांनी सोमवारी (२८ रोजी) उल्हासनगर येथील शेवीज हेल्थ सेंटरमध्ये अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात पत्नी, एक विवाहित मुलगा, सुन व नातू असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी उशीरा बदलापूर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. पुत्र कुणाल वाडेकर यांनी त्यांना अग्नी दिला. वाडेकर परिवार हा मुळचा रेवदंडा येथील आहे.

सरस्वती वाघ यांचे निधन

। नागोठणे । वार्ताहर ।

कोंडगावचे उपसरपंच अनंत आत्माराम वाघ यांच्या आई सरस्वती उर्फ लक्ष्मीबाई आत्माराम वाघ (वय ९२) यांचे बुधवारी (३० ऑगस्ट) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे,चार मुली, सुना, जावई , नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. दशक्रिया विधी शुक्रवारी (८ सप्टेंबर) उत्तरकार्य सोमवारी (११ सप्टेंबर) कोंडगाव येथे होणार आहे.

'बॅ.ए.टी.पाटील उत्तुंग व्यक्तिमत्व'

पेण येथे अभिवादन कार्यक्रम,मान्यवरांचा सहभाग

। पेण । प्रतिनिधी ।

कर्मयोगी खासदार बॅ ए.टी.पाटील हे उत्तुंग व्यक्तिमत्व होते. त्यांच्या कार्याची ओळख अवघ्या महाराष्ट्राला होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन खा.सुभाष भामरे यांनी गुरुवारी (३१ ऑगस्ट) पेण येथे केले. पाटील जन्मशताब्दी निमित्त पेण येथील आगरी समाज हॉल येथे ए.टी.पाटील विचार मंचातर्फे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास खा.सुनील तटकरे, आ. रवी पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. भामरे यांनी आपल्या भाषणातून ए.टी. पाटील यांच्या कार्याचे कौतुक केले. पाटील हे केवढे महान होते. त्यांच्या कार्याची उंची केवढी आहे. हे फक्त या भागातील जनतेला माहित आहे. मात्र असे चालणार नाही त्यांच्या कार्याची उंची आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व संपूर्ण महाराष्ट्राला समजणे व महाराष्ट्राला त्याची ओळख असणे गरजेचे आहे. त्यासाठी फक्त विशेष अंक काढून चालणार नाही तर एक मोठे पुस्तक लिहिणे गरजेचे आहे.असे ते म्हणाले.

पुढे डॉ. भामरे यांनी सांगितले की, बॅ.ए.टी.पाटील यांच्यासारखी माणस राजकारणात असतील तर समाज कारणात त्याचा योगदान नक्कीच मोलाचा असेल. आज ओ.बी. सी आरक्षण ही ए.टी.पाटील यांनी दिलेली आगरी समाजाला मोलाची देण आहे. त्याचप्रमाणे खारलँडच्यासाठी जो कायदा केला त्याच्यासाठी देखील मोलाचे योगदान आहे.असे ते म्हणाले.

यावेळी आमदार रवीशेठ पाटील, खा. सुनील तटकरे यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. तर ए.टी. पाटील यांचे चिरंजीव डॉ. सिध्दार्थ पाटील यांनी प्रास्ताविक केले. या कार्यक्रमासाठी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते.

क्षयरोगमुक्त पंचायत काकळघरला कार्यक्रम

। आगरदांडा । वार्ताहर ।

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत मुरुड तालुकातील निवड झालेल्या ग्रुप ग्रामपंचायत काकलघर येथे क्षयरोगमुक्त पंचायत उपक्रम राबविण्याबाबत बैठक घेवून विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. क्षयरोग मुक्त भारत या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून संपूर्ण देशात क्षयरोग दुरीकरण व जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येत आहेत याचाच भाग म्हणून मुरुड-जंजिरा तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत काकळघर येथे सरपंच - स्वस्तिक ठाकूर यांच्या अध्यक्षेखाली बैठक घेवून व्यक्ती समर्थन गट तयार करण्यात आला आहे.

यामध्ये सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, समुदाय वैदयकिय अधिकारी, मुख्याध्यापक,आरोग्य सेवक, आशा सेविका, समाजसेवक, बचत गट प्रतिनिधी व अंगणवाडी सेविकांचा समावेश करण्यात आला आहे.

तसेच ग्रुप ग्रामपंचायत काकळघर अंतर्गत येणाऱ्या गावामध्ये क्षयरोग जनजागृती सभा, शाळेमध्ये रांगोळी स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व रॅलीचे आयोजन करून जनजागृती करण्याचे ठरविण्यान आले. त्याचबरोबर गावातील १००% लोकांची क्षयरोग तपासणी करण्याचे ठरविले आहे. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय मुरूड येथील वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक - संकेत घरत यांनी माहिती दिली.

कोर्लई, थेरोंड्यात ९९ लाखांचा चरस जप्त

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

श्रीवर्धन पाठोपाठ चरसच्या पिशव्या कोर्लई आणि थेरोंडा किनारी सापडल्या आहेत.यामध्ये २४ किलो ९०८ ग्रॅम वजनाचा चरस असून,बाजारात याची किंमत रूपये ९९ लाख ६३ लाख २०० रूपये असल्याची माहिती रेवदंडा पोलिसांच्यावतीने देण्यात आली. रेवदंडा व थेरोंडा समुद्र किनारी एकूण ११ पाकिटे सापडली आहेत.आतापर्यंत एकूण ११८ पाकिटे सापडली असून ४.५ कोटी रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल अतिग्रे व उपनिरीक्षक शिवकुमार नंदगावे यांनी तातडीने सहकाऱ्यांसह पाहणी केली. यावेळी या ठिकाणी सापडून आलेल्या पाकिटावर समोरील बाजूस मध्यभागी गोल आकारात गरूडाचे व नागाचे चिन्ह व त्याच्या बाजूला इंग्रजी मध्ये अफगाण प्रॉडक्ट नाव असे लिहिलेले आहे. ही अक्षरे ऊर्दूमध्ये आहेत. एकूण नऊ प्लाष्टीक पिशवीची पाकिटे व काही फाटलेल्या पाकिटामधून बाहेर येवून तुकडे पडून वाळू मध्ये पसरलेल्या हिरवट काळसर रंगाचा पदार्थ असा मौजे कोर्लई समुद्र किनारी १३ किलो ७२० ग्रॅम वजनाचा अंदाजे रूपये ५४ लाख ८८ हजार रूपये किंमतीचा चरस नावाचा अंमली पदार्थ तसेच थेरोंडा समुद्र किनारी ११ किलो १८८ ग्रॅम वजनाचा एकूण ४४ लाख ७५ हजार २०० रूपये किमंतीचा असा एकूण २४ किलो ९०८ ग्रॅम वजनाचा रूपये ९९ लाख ६३ लाख २०० रूपये किमंतीचा चरस नावाचा अमंली पदार्थ असलेला मुद्देमाल सापडला आहे.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपविभागीय अधिकारी अरूण भोर यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली.

कर्जत व्यापारी संकुलातील गाळे खुले करा

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत नगरपरिषद हद्दीत बाजारपेठ आणि मुख्य रस्त्यांच्या कडेला असलेले गाळे पूर्ववत सुरू करण्याची मागणीसाठी शिवसेना शिंदे गटाने कर्जत नगरपरिषद प्रशासनाला पत्र देवून केली. गेली पाच वर्षे हे गाळे बंद असून स्थानिक तरुणांना रोजगार देण्यासाठी शिंदे गटाने ते गाळे खुले करावेत अशी मागणी केली आहे.

नगरपरिषदेच्या ताब्यात असलेले शॉपिंग झोन मधील गाळे आजपर्यंत बंद आहेत. स्थानिक बेरोजगारांना हे गाळे देऊन रोजगाराला प्राधान्य द्या तर पालिकेचा महसूल ही बुडला जातोय आणि त्यामुळे ते गाळे पुन्हा सुरू करून महसूल सुरू करावेत या मागणीसाठी शिवसेना शिंदे गटाचे वतीने निवेदन देण्यात आले. कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे यांनी कर्जत नगर परिषदेला घेराव घालून संतप्त सवाल केला.मात्र नेहमीप्रमाणे पालिकेचे मुख्याधिकारी हे अनुपस्थित असल्याने हे निवेदन कार्यालयीन अधिक्षक रविंद्र लाड यांच्याकडे देण्यात आले.

नगरपरिषद हद्दीतील जुने एस. टी. स्थानक भिसेगाव, कर्जत सर्व्हे नं. २३/२, मंगलमूर्ती हि इमारत गुंडगे रोडवर आहे. येथील गाळे स्थानिक बेरोजगार युवकांना भाडेतत्त्वावर देणेबाबत क सुर्वे आणि सचिन खंडागळे यांच्या वतीने मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. भिसेगाव व गुंडगे परिसरातील स्थानिक युवकांच्या मागणीनुसार जुने एस. टी. स्टॅन्ड, भिसेगाव, कर्जत सर्व्हे नं. २३ / २ मंगलमूर्ती इमारती मधील गाळे अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत आहेत. सदरील नगरपरिषदेचे गाळे स्थानिक बेरोजगारांना भाडेतत्त्वावर दिल्यास नगरपरिषदेस उत्पन्न सुरु होईल व व्यवसायाची संधी उपलब्ध होईल.

● श्री गणेशाच्या आगमनाचे वेध आता गणेशभक्तांना लागलेले आहेत.त्यासाठी आवश्यक असणाऱ्या साहित्याची दुकाने ठिकठिकाणी सजली आहेत. पनवेलमध्ये इको फ्रेंडली मखर खास कलाकारांनी बनवले आहे हे सर्व मखर दोन वर्ष वापरु शकतो. (छाया -राजेश डांगळे)

मुरुडची लालपरी बाप्पांसाठी सज्ज

वीस अतिरिक्त गाड्यांची सोय,आरक्षणाची सुविधा द्या

। आगरदांडा । वार्ताहर ।

पंधरा दिवसावर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी मुरुड आगारातून गणेशभक्तांच्या सोयीसाठी वीसहून अधिक जादा एसटी बसेस सोडण्यात येणार आहेत. याचा फायदा मुंबई, पुणे, कल्याण, डोंबिवली, नालासोपारा, ठाणे,पनवेल, रोहा, बोरिवली आदी भागातील गणेशभक्तांनाा होणार आहे. या जादा गाड्यांसाठी एसटीने आगाऊ आरक्षण सुविधा सुरु करावी,अशी मागणी गणेश भक्तांकडून होत आहे. याबाबतचे निवेदन महेश कारभारी यांनी विभागीय नियंत्रकाना दिले आहे.

वरीलप्रमाणे गाड्या आरक्षणास उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी- पेण विभागीय वाहतूक नियंत्रक -आशिष पाटील यांच्या कडे केली आहे. अशी माहिती महेश कारभारी यांनी दिली आहे.याला सकारात्मक उत्तर वाहतूक नियंत्रक यांच्या कडुन मिळाला आहे.लवकरच २० गाड्या जादा मुरुड आगारात उपलब्ध होतील आणि लवकरच आरक्षणाला सुरवात होईल. अशी माहिती कारभारी यांनी दिली. मुरुड आगारात उपलब्ध असणाऱ्या गाड्यांचे आरक्षण संपले आहे.

आरक्षित गाड्या

२४ सप्टेंबर: मुरुड ते मुंबई सर्व गाड्या फुल आहेत: सुटण्याच्या वेळा : ४.४५, ६.३०, ६.३०(व्हाया भालगाव) ८.३०,१० ,१,३ (व्हाया भालगावं) ५.३०,११ मुरुड ते बोरिवली सर्व गाड्या फुल आहेत. सुटण्याच्या वेळा: ११ ,११.३०,२,३, मुरुड ते ठाणे ६ , ४.३०,मुरुड कल्याण ५.१५, ७.३०,१२.३०,२.३० या गाड्या बुकींग झाल्या आहेत.

जादा गाड्यांची मागणी

१९ सप्टेंबर - रात्रौ ११.४५, **२० सप्टेंबर:** रात्रौ ११.४५, **२३ सप्टेंबर:** मुरुड मुंबई गाडी रात्रौ ११.३०,१२/४५, **२४ सप्टेंबर:** मुरुड मुंबई सकाळी ७/३०, २/३० (व्हाया भालगाव) मुरुड- मुंबई (व्हाया अलिबाग)२.१५, ३. ३०, ४. ४५, ६. १५, ७.३०, मध्यरात्री १२.३०, १२.५०, १२.५५, १.१५, मुरुड बोरिवली १२.५०, २.३५, ३.४५, ५.४५, मुरुड ठाणे १२.३०, ५, मुरुड कल्याण ३. ३०, मुरुड-पनवेल १. ३०, **२५ सप्टेंबर :** ५,मुरुड मुंबई, ५.१५ मुरुड पनवेल, ५.३० मुरुड पनवेल

अलिबागमध्ये विद्यार्थ्यांनी गिरवले कायद्याचे धडे

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचा उपक्रम

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या वतीने कुरुळ येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या सृजन माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना आदिवासी हक्कांचे संरक्षण आणि अंमलबजावणी आणि रस्ते वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सृजन माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सुजाता पाटील यांनी प्रास्ताविक केले.

त्यानंतर निलोफर शेख यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे उदाहरण देउन शिक्षणाचे महत्त्व व अधिकार याबाबत मार्गदर्शन केले.

ॲड. मिलिंद साळावकर यांनी शनिवार, रविवार ट्रॅफिक असते, तर आपण रस्त्यातून जाताना कशाप्रकारे वाहतूकीचे नियम पाळले पाहिजेत तसेच वाहन चालविण्यासाठी लायसन्स काढण्याकरिता आपले वय १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे, हे मुलांना समजावून सांगितले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव अमोल अ. शिंदे यांनी मुलांजवळ संवाद साधून मार्गदर्शन केले.

सावलीचे भूत

गेल्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये भाजप चढत्या बहुमताने निवडून आला. २०१९ मध्ये राफेल घोटाळ्याचा मुद्दा गाजत होता. नोटबंदीमुळे लाखो लोकांना फटका बसलेला होता. विरोधी आघाडी एकवटण्याचा प्रयत्न झाला होता. त्यामुळे विरोधकांना मोठी आशा होती. पण प्रत्यक्षात एकट्या भाजपला ३०३ जागा म्हणजे निर्णायक बहुमत मिळाले. त्यावेळी व आधीही विरोधकांनी इव्हीएम यंत्रांवर बराच संशय व्यक्त केला. मतदाराने मत कोणालाही दिले तरी शेवटी कमळावरच शिक्का मारला जातो असे प्रात्यक्षिकही काही तज्ज्ञांनी दाखवले. पण निवडणूक आयोगाने हे आरोप फेटाळून लावले. शिवाय मध्यंतरी मध्य प्रदेश, राजस्थान, बंगाल, तमिळनाडू, कर्नाटक इत्यादी राज्यांमध्ये भाजपचा मोठा पराभव झाला. त्यामुळे विरोधकांचीही पंचाईत झाली. मात्र भाजप या प्रक्रियेत काहीतरी गडबड करते आहे हा संशय फिटला नाही. त्याला पुष्टी देणारे एक संशोधन अलिकडेच प्रसिध्द झाले. दिल्लीच्या अशोका विद्यापीठातील सव्यसाची दास या प्राध्यापकांचे हे संशोधन असून त्यामुळे भाजपच्या एकूण निवडणूक चारित्र्यावरच शंका निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ही शंका बळकट करणाऱ्या अनेक गोष्टी संशोधन प्रसिद्ध झाल्यावर घडल्या आहेत. या प्राध्यापकाची चौकशी करण्यासाठी इंटेलिजन्स ब्यूरो या आपल्या सर्वोच्च गुप्तचर संस्थेचे अधिकारी अशोका विद्यापीठात दाखल झाले. विद्यापीठाच्या व्यवस्थापनावर त्यामुळे दबाव आला. त्यातून या संशोधनाशी विद्यापीठाचा काहीही संबंध नाही असे घाईघाईने जाहीर केले गेले. हा केवळ तर्कावर आधारलेला प्राथमिक प्रबंध आहे असा खुलासा केला गेला. मग दास यांच्या बाजूने अनेक प्राध्यापक व विद्यार्थी संघटना उभ्या राहिल्या. त्याला राजकीय स्वरुप आले. भाजपचे भक्त सरसावले. त्यांनी दास यांना देशद्रोहाचा आरोप ठेवून अटक करण्यात यावे अशी मागणी केली. अखेर दास यांनी राजीनामा दिला. एरवी चार प्राध्यापकांच्या पलिकडे कोणी वाचलाही नसता अशा प्रबंधामुळे सरकारचे कान टवकारले जावेत व दास यांना नोकरी सोडावी लागावी याचा अर्थ नक्कीच यामागे काळेबेरे आहे असा संशय दृढ झाला आहे.

प्रबंधात काय

सर्वच निवडणुकांमध्ये अत्यंत कमी फरकाने उमेदवार जिंकले असे प्रकार घडतात. मात्र नगरपालिका किंवा ग्राम पंचायतीत एकेका वॉर्डात मतदान कमी असते. तिथे असे प्रकार घडणे समजण्यासारखे असते. पण एका लोकसभा मतदारसंघामध्ये सरासरी पंधरा लाख मतदार असतात. त्यातील पन्नास ते साठ टक्के प्रत्यक्ष मतदान करतात. बहुतेकदा लढत मुख्य दोन किंवा तीन उमेदवारांमध्येच होते. त्यामुळे जेमतेम काहीशे मतांनी हार वा जीत होण्याचे प्रकार कमी असतात. दास यांनी अशा मतदारसंघांचा अभ्यास केला. त्यांना असे आढळले की, २०१९ मध्ये अशी घासून निवडणूक झालेल्या बहुतांश ठिकाणी भाजपचा उमेदवार विजयी झाला आहे. एरवी असा प्रकार योगायोग म्हणून सोडून देता आला असता. पण पूर्वीच्या अनेक निवडणुकांचे निकाल तपासले तेव्हा चित्र वेगळे आढळले. तेव्हाच्या अशा लढतीत जिंकलेले उमेदवार एकाच पक्षाचे आहेत असे घडले नव्हते. त्यामुळे दास यांनी अधिक बारकाईने तपास केला. त्यावेळी त्यांना अशा घासून झालेल्या लढतींमध्ये सर्व उमेदवारांना पडलेली एकूण मते व निवडणूक यंत्रांवर नोंदली गेलेली एकूण मते यांचा काहीच ताळमेळ बसत नाही असे आढळले. विशेष म्हणजे ही भानगड बाहेर आल्यावर निवडणूक आयोगाने आपल्या वेबसाईटवरून ही माहितीच गायब करून टाकली. दास यांना असेही आढळले की, बरोबर याच मतदारसंघांमध्ये मुस्लिम मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर यादीतून उडवण्यात आली आहेत. हे तीन निष्कर्ष एकत्र ठेवल्यावर हे स्पष्ट दिसत होते की, या मतदारसंघांमध्ये नक्कीच काहीतरी घोटाळा झालेला आहे. नेमक्या घासून लढती होण्याच्या शक्यता असलेल्या मतदारसंघांमध्येच भाजपच्या राज्य सरकारांमधील कनिष्ठ अधिकारी मतदानकेंद्रांवर तैनात असल्याचेही दिसले. भाजपचे यश वाटते तितके सरळ नाही या शंकेला सज्जड आधार देणारे हे संशोधन आहे.

पराभवाची भीती

विशेष म्हणजे, सार्वजनिक स्वरुपात उपलब्ध असलेली अधिकृत माहिती वापरूनच दास यांनी हे संशोधन सिध्द केले आहे. दास हे अमेरिकेच्या येल विद्यापीठातून पदवी घेतलेले अभ्यासक आहेत. त्यांचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नाही. आपल्या संशोधनासाठी त्यांनी अर्थशास्त्र व गणितातल्या मान्य पध्दतींचा उपयोग केला आहे. त्यांना खोटे पाडणे सोपे नाही. यामुळे भाजपची मोठी अडचण झाली. म्हणून मग गुप्तचर पोलिस वगैरे पाठवून त्यांना व विद्यापीठाला धमकावण्याचा प्रयत्न झाला. चोराच्या मनात चांदणे असा हा प्रकार झाला. एकीकडे मोदी हे सर्वात लोकप्रिय नेते आहेत असे सांगितले जाते. २०१४ पेक्षाही अधिक बहुमत २०१९ मध्ये मिळाले याचा गाजावाजा केला जातो. तसे असेल तर भाजपला एका प्राध्यापकाच्या संशोधनाची इतकी भीती का वाटावी? विशेष म्हणजे घासून झालेल्या लढतीतील भाजपच्या एकूण जागांची संख्या जेमतेम नऊ किंवा दहा असून त्या कमी झाल्या तरीही भाजपच्या बहुमतावर परिणाम होत नाही हे खुद्द दास यांनीच स्पष्ट केले आहे. तरीही भाजप व मोदी सरकारने जे आकांडतांडव चालवले आहे ते पाहता यात अधिक पाणी मुरते आहे असे दिसते. पुढची निवडणूक आपणच जिंकणार असे नरेंद्र मोदी कितीही जोरात सांगत असले तरी गेल्या काही महिन्यांमधील भाजपच्या वागण्यातून वेगळेच संकेत मिळतात. महाराष्ट्रात शिंदे व फडणवीस यांचे सरकार बहुमतात असतानाही ज्या रीतीने राष्ट्रवादी फोडण्यात आली व अजितदादांना उपमुख्यमंत्री करण्यात आले हे त्याचे एक उदाहरण होय. इंडिया या विरोधकांच्या आघाडीवर खालच्या पातळीवर जाऊन चालू असलेली मोदींची टीका, घाईघाईने एनडीए आघाडीची बैठक बोलावून आपल्यामागे ३५ पक्ष असल्याचा करण्यात आलेला दावा हेही त्याचेच मासले होत. आपल्या भानगडी बाहेर पडतील आणि जनता आपल्याला फेकून देईल अशी भीती भाजपला वाटते आहे. आपल्याच सावलीला ते दचकू लागले आहेत.

विचार

शेतकऱ्यांना असं करता येईल का?

निवडणुकीला साधारण वर्षभराचा कालावधी आहे.स्वत:ला शेतकरी वा त्यांचे हितकर्ते ,सहानुभूतीदार म्हणवून घेर्णाय़ांनी,कुठल्याही राजकीय पक्षाचे थेट प्रचारक बनू नये.त्याऐवजी शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतीबाहेरच्या समर्थकांचा एक व्यापक दबावगट निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. या गटाने शेतकरी हिताचा एक व्यवहार्य जाहिरनामा तयार करावा. त्यात शेती विरोधी कायदे रद्द करण्याच्या मागणीपासून इतर सर्व महत्त्वाचे मुद्दे समाविष्ट करावेत.

महारुद्र मंगनाळे

सगळे शेतकरी एकत्र येत नाहीत. त्यांना एकत्र करू शकेल असा एकही शेतकरी नेता नाही. शेतकरी संघटीतपणे आपल्या समोर आव्हान निर्माण करू शकत नाहीत,याची खात्री पटल्यानेच , केंद्र सरकार एकापाठोपाठ एक शेतकरी विरोधी निर्णय घेत आहे.सरकारला एक मतदार म्हणून शेतकऱ्यांची अजिबात भीती वाटत नाही, ही वस्तुस्थिती आहे.ही भीती शेतकरी कुठल्या तरी मार्गाने निर्माण करू शकतात का? हा कळीचा मुद्दा आहे.

सरकारला शेतकऱ्यांपेक्षा मध्यमवर्गीय मतदारांची अधिक चिंता आहे.त्यांची मतं त्यांना अधिक मोलाची वाटतात.. आणि दूर्देवाने हे मध्यमवर्गीय शेतकऱ्यांचे शत्रू आहेत.डिझेल,पेट्रोल, स्वयंपाकाचा गँस, कपडे,साबण,भांडी,वाहने,प्रवास शिवाय शेतीला लागणारी रासायनिक खते,कीटकनाशके, तणनाशके,अवजारे अशा शेकडो वस्तुंच्या किमती प्रचंड वाढल्या. याबद्दल या मध्यम वर्गाची कसलीच तक्रार नाही. याविरूध्द ते कधी रस्त्यावर आल्याची घटना नजिकच्या काळात घडलेली नाही. मात्र कांदा,लसूण,टोमॅटो वा भाजीपाल्याच्या किमती वाढल्या की,त्यांना भयंकर दु:ख होतं.त्याविरुद्ध ते ओरड करतात. भारतातील मुख्य मिडीया या भाववाढीविरूध्द वातावरण पेटवायला टपलेलाच असतो.या दरवाढीमुळे सामान्य जनतेचं जगणं कसं असह्य झालयं,याचे रिपोर्ट येऊ लागतात.ते सरकार पर्यंत पोचतात.सरकारला भीती वाटते की,आपला हा मतदार नाराज होईल.लगेच सरकार तातडीने हे भाव पाडण्यासाठी कारवाई करते.यात मध्यमवर्गीयांचा फार थोडा फायदा होतो.मात्र शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान होतं.गंमत म्हणजे, मध्यमवर्गीयांना खूष करण्यासाठी सरकार विदेशातील शेतकऱ्यांचा फायदा करते आणि देशातील शेतकऱ्यांची माती.मध्यमवर्गीय देशभक्त नागरिकांना याची अजिबात लाज वाटत नाही.माझा मुद्दा हा आहे की,सरकारला शेतकऱ्यांची भीती वाटू लागेल, असं काय करता येईल?

मिडीयाच्या विरूद्ध शेतकरी नेहमीच तावातावाने बोलतात.राग व्यक्त करतात.मात्र याला काहीच अर्थ नाही. मिडीया चालवणारे मालक कोण आहेत बघा.त्यांचा अजेंडा शेतकऱ्यांची माती करणे हाच आहे.दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे,शेतकरी त्यांचा महत्त्वाचा ग्राहक नाही. तो जाहिरातदार नाही किंवा सरकारवर प्रभाव टाकणारा घटक नाही. अशा स्थितीत ते शेतकऱ्यांची बाजू का घेतील?

शेतकरी, हा शब्द ऐकायला छान वाटत असला आणि मोठी लोकसंख्या स्वत:ला शेतकरी म्हणवून घेत असली तरी,एक शक्ती म्हणून तिचं अस्तित्व दिसत नाही.कारण ऊस उत्पादक,फळबागवाला,कांदा उत्पादक, भाजीपाला उत्पादक,कोरडवाहू, बागायतदार शिवाय विविध जातींमध्ये हा शेतकरी विभागला गेलाय.या सगळ्यांना काही काळासाठी तरी एकत्र करण्यात शरद जोशी यांना यश मिळालं. त्यांच्या काळात जे काही शेतकऱ्यांना मिळालं ते आंदोलनातून.संघटनेची भीती निर्माण झाली होती म्हणून सरकारने त्या त्या वेळी मागण्या मान्य केल्या. अर्थात हे यश मर्यादित काळच राहिलं. माझा मुद्दा हाच आहे की,सद्यस्थितीत सरकार कशाला घाबरते,कशापुढे झुकते,ते पाहून रणनिती ठरवली तरच,काही घडू शकेल.

शेतकऱ्यांच्या वेदनेच्या शेकडो,कथा- कविता छापून आल्या. आजही येताहेत.समाजमाध्यमांवर अशा रडकथा आजही शेकडोंनी येताहेत. काहीजण वाचत असतील, कोरडी सहानुभूतीही व्यक्त होत असेल. मात्र प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने त्या रडण्याचा काहीच उपयोग होत नाही. समाजमन एवढं कोडगं बनलयं की,अशा दु:खाची टिंगलटवाळी होते.शेतकऱ्यांची दु:खं एवढ्यांदा मांडली गेलीत की,त्यात लोकांना काही नाविन्य वाटत नाही.... मग ती पुन्हा पुन्हा मांडून त्याचा उपयोग काय? व्यक्तीगत मोकळं होणं एवढंच.

केंद्रसरकारचे तीन कृषी कायदे,चांगले होते की वाईट, हा इथं चर्चेचा मुद्दा नाही.सरकारने या कायद्यांवर संसदेत व बाहेरही फारशी चर्चा न होऊ देता,घिसाडघाईने पास केले,ही वस्तुस्थिती आहे.त्यामुळे सरकारच्या हेतुबद्दलचं शंका निर्माण झाली. हरियाणा, पंजाब व उत्तरप्रदेशच्या शेतकऱ्यांना हे कायदे त्यांच्या हिताच्या विरूध्द आहेत,असं वाटलं.ते या कायद्याच्या विरोधात रस्त्यावर उतरले.टोकाचा संघर्ष केला.त्यांना देशद्रोही ठरवण्याचा प्रयत्न झाला.सरकारने आंदोलन दडपण्याचे सर्व प्रयत्न करूनही, त्यांनी माघार घेतली नाही. उलट शेतकरी महिनोन्महिने रस्त्यावरची लढाई लढू शकतो,हे त्यांनी दाखवून दिलं. आम्ही काहीही करू शकतो,अशी गुर्मी बाळगर्णाय़ा केंद्र सरकारला हे तिन्ही कायदे बिनशर्त मागे घ्यावे लागले.रस्त्यावरील प्रभावी आंदोलन, मस्तवाल लोकांचं डोकंही ठिकाणावर आणू शकते,याचं हे नजिकच्या काळातील ताजं उदाहरण. मुख्यतः गहू उत्पादक शेतकऱ्यांचं हे आंदोलन होतं.

महाराष्ट्रात कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने ,दोनवेळा मोठे लाँगमार्च काढण्यात आले.सरकारने त्यांच्या मागण्या मान्य केल्याचंही सांगीतलं गेलं.मात्र ज्यांच्यासाठी हे आंदोलन झालं,त्यांना त्याचा नेमका किती फायदा झालाय, याचा लेखा जोखा संबंधितांनी मांडायला हवा.

शेतकऱ्यांचा राजकीय पक्ष हाही प्रयोग शेतकरी संघटनेने करून पाहिलाय.स्वतंत्र भारत पक्षाची निर्मिती शेतकऱ्यांसाठी करण्यात आली पण त्याला फारच मर्यादित यश मिळाले.तेही मर्यादित वेळेत.याचे कारण शेतकरी हा फार काळ संघटीत राहात नाही. आर्थिक प्रश्नापेक्षा जातीय आवाहन त्याला अधिक भावतं.तो शेतकरी म्हणून मतदान करीत नाही, हेच आहे. आज त्या पक्षाचे अस्तित्व नावालाच आहे.आजच्या स्थितीत शेतकऱ्यांचा म्हणावा असा एकही राजकीय पक्ष नाही, ही वस्तुस्थिती आहे.एखाद्या छोट्याशा राज्यात, कोणीतरी शेतकऱ्यांना भरपूर सवलती दिल्या म्हणून तो शेतकऱ्यांचा पक्ष ठरत नाही. एका छोट्या राज्याचं मॉडेल ,मोठ्या राज्यात राबवता येत नाही. कोण कुठल्या पक्षात जावं,कोणासाठी काम करावं,हा व्यक्ती स्वातंत्र्याचा भाग आहे.भूतकाळात कोण कुठे होता,यालाही फारसं महत्त्व नाही. प्रत्येकाला स्वत:चं भलं करून घेण्याची प्रेरणा असते.त्यात चुकीचं काही नाही. पण प्रत्येक जण शेतकरी हितासाठी, त्यांच्या भल्यासाठी मी अशी राजकीय भूमिका घेतोय,असं म्हणतो तेव्हा त्यांची कीव करण्यापलिकडं आपण काही करू शकत नाही.

आज माझ्यासाठी शत्रू क्रमांक एकवर भाजपा आहे.याचा अर्थ इतर पक्ष मित्र आहेत, असं अजिबात नाही. त्यांच्या शेतकरी विरोधी धोरणांना मी सातत्याने विरोध करीत आलोय.तो आजही आहे.भाजपा आज सत्ताधारी पक्ष आहे.नऊ वर्षांपासून केंद्रात सत्तेत आहे.सबका साथ ,सबका विकास म्हणत त्याने सगळ्यांनाच बर्बाद केलंय. त्यातही शेतकऱ्यांचं अधिक नुकसान केलं.शिवाय देशातील सामाजिक सौहार्दाचं वातावरण संपवलंय,म्हणून तो शत्रू क्रमांक एक. अशावेळी प्रत्येकजण विचारतो की,मग कोणता पर्याय निवडायचा.खरं तर एका वाक्यात उत्तर देण्यासारखा हा प्रश्न नाही.

निवडणुकीला साधारण वर्षभराचा कालावधी आहे. स्वत:ला शेतकरी वा त्यांचे हितकर्ते ,सहानुभूतीदार म्हणवून घेर्णाय़ांनी,कुठल्याही राजकीय पक्षाचे थेट प्रचारक बनू नये.त्याऐवजी शेतकऱ्यांचा व त्यांच्या शेतीबाहेरच्या समर्थकांचा एक व्यापक दबावगट निर्माण करण्याचा प्रयत्न करावा. या गटाने शेतकरी हिताचा एक व्यवहार्य जाहिरनामा तयार करावा.त्यात शेती विरोधी कायदे रद्द करण्याच्या मागणीपासून इतर सर्व महत्त्वाचे मुद्दे समाविष्ट करावेत.त्याआधी ठिकठिकाणी बैठका ,मेळावे घेऊन शेतकऱ्यांसमोर ते मांडावेत. हा जाहीरनामा निश्चित झाल्यानंतर, तो राजकीय पक्षांसमोर ठेवावा.जो कुठला पक्ष हा जाहीरनामा मान्य करेल,जास्तीत जास्त कलमं मान्य करेल,जो लिखीत स्वरूपात आश्वासन देईल, ज्यांच्याबद्दल विश्वास वाटेल ,त्यांना पाठिंबा द्यावा. त्यातून शेतकऱ्यांच्या हाती काही भरीव लागू शकेल,त्याचवेळी रस्त्यावर उतरण्याचीही तयारी ठेवावी लागेल,असं मला वाटतं.

केवळ फेसबुक, व्हाट्सएपवर शेतकऱ्यांची लढाई लढली जाणार नाही. सरकारसाठी ती दखलपात्रही नाही. शेतकऱ्यांमध्ये एवढे गट,तट ,नेते आहेत की,त्याची मोजदाद करणेही कठीण आहे. प्रत्येकाचे हितसंबंध वेगळे, अहंकार वेगळे.मी मोठा की तू,कोणाच्या मागं जास्त शेतकरी आहेत,हे दाखविण्याची धडपड.प्रत्येकाला वाटतयं की,फक्त तोच शेतकऱ्यांचं भलं करू शकतो.आपापलं संस्थान,दुकान उभारण्यात,टिकवण्यात प्रत्येकजण व्यस्त आहे.ही काही कोणावर टीका नाही,वस्तुस्थिती आहे. हे सगळं माहिती असतानाही, मी हे लिहितोय,हा भाबडेपणाच आहे. हे लिहिणं ,सुचवणं फार सोपं आहे.पण याची अंमलबजावणी कोण करायची? कोण पुढाकार घ्यायचा? आपला झेंडा कायम ठेऊन कोणी पुढे आले तर,त्याच्या मागे इतर शेतकरी उभे राहतील का? ....असे कितीतरी प्रश्न आहेत. त्याची उत्तरं माझ्याकडं नाहीत. कारण मी कार्यकर्ता नाही तर पत्रकार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सरकार दखल घेईल, असं शेतकऱ्यांना काय करता येईल, याचा मी विचार करीत होतो. त्यातून हे सुचलं.हे काही परिपूर्ण नाही. आणखी कोणाला काही सुचलं तर,त्याची भर घालता येईल.कोणाला वेगळा कार्यक्रम सुचवता आला तरी त्याचं स्वागत आहे.मुख्य मुद्दा हाच आहे की,सरकारला दखलपात्र वाटेल असा शेतकऱ्यांचा दबाव गट व त्यामार्फत कार्यक्रम देता येईल का? हे काम खुप कठीण आहे पण अशक्य नाही. कोणी पुढाकार घेतला तर,मी त्याच्या सोबत नक्की आहे...रस्त्यावर उतरायची पण तयारी आहे. **(फेसबुकवरून साभार)**

आजकाल

गॅस सिलेंडर खरंच स्वस्त झाला का?

संजीव चांदोरकर

केंद्र सरकारने प्रत्येक एलपीजी सिलेंडरच्या किमतीत प्रति सिलेंडर २०० रुपये कपात केली आहे ; त्याचे सर्वप्रथम स्वागत !

आणि मग लोकशाही प्रणालीत नागरिक म्हून आपणच निवडलेल्या मायबाप सरकारवर टीका करण्याचा हक्क देखील बजावूया, हा निर्णय सुटा सुटा म्हणून न बघता त्याकडे देशातील सामान्य नागरिकांचे भौतिक राहणीमान ठरवणाऱ्या राजकीय अर्थव्यवस्थेचा भाग म्हणून बघूया

हा आणि हाच एकमेव दृष्टिकोन असला पाहिजे ; सुटे नाही समग्रपणे पाहणे

देशात एलपीजी सिलेंडरचे ३१ कोटी कनेक्शन्स आहेत ; त्यात १० कोटी पंतप्रधान उज्वला योजनेतील गरीब घटकातील ग्राहक आहेत

हा कनेक्शन शब्द महत्वाचा आहे कारण अनेक मध्यमवर्गीय घरात एकापेक्षा जास्त कनेक्शन असतात ; त्यामुळे देशात किती कुटुंबाना अन्न शिजवण्यासाठी कुकिंग गॅस मिळतो हा आकडा महत्वाचा ; तो आतातरी उपलब्ध नाही. हा इश्यू टेबलवर आणूया

पोस्टसाठी १० कोटी उज्वला कनेक्शन वर बोलूया ; ज्यांचे उज्वला कनेक्शन आहे त्यांना केंद्र सरकार प्रत्येक सिलेंडर मागे २०० रुपये कॅश बेनेफिट ट्रान्स्फर आधीपासून करते

कालचे २०० रुपयांचा लाभ सरसकट सर्व ग्राहकांना मिळणार ; तरी देखील आपली पोस्ट १० कोटी उज्वला ग्राहकांवरच केंद्रित करूया

गरिबांना २०० रुपये प्रति सिलेंडर लाभ मिळणार; फाईन. दर महिन्याला २०० रुपये वाचणार, सिलेंडर वरचा खर्च कमी होणार , म्हणजे २०० रुपये इतर गोष्टींवरच्या खर्चासाठी उपलब्ध होणार , राईट ? म्हणजे किती दिवसाला ७ रुपये एक्सट्रा उपलब्ध होणार !

अरे वा दर दिवसाला ७ रुपये जादा !

कल्याणकारी योजनांसाठी एकच शब्द पुरेसा आहे : टोकानिझम

आपण गृहीत धरले कि दार महिन्याला उज्वला ग्राहक सिलेंडर घेतात ; तर वस्तुस्थिती काय आहे ; मंत्र्यांनी दिलेल्या आकडेवारी नुसार उज्वला ग्राहक वर्षातून सरासरी फक्त ३.७ वेळा संपलेला सिलेंडर रिफील करतो का कुटुंबासाठी अन्न शिजवणाऱ्या स्त्रियांना स्वच्छ इंधन आवडत नाही? कमी शिक्षणामुळे त्याचे फायदे कळत नाहीत

एका शब्दातील उत्तर आहे ; सबसिडी घेऊन देखील १० कोटी कनेक्शन वाल्या कुटुंबाना कन्सेशनल किंमत देखील परवडत नाही

उत्तर सर्वांना माहित आहे ; पण सार्वजनिक व्यासपीठांवर त्याची वाच्यता करायची नाही ; आणि इथे गरिबीची पोलिटिकल इकॉनॉमीची चर्चा केल्या शिवाय चर्चा पुढेच जाऊ शकत नाही

–

८० कोटी गरिबांना वस्तुमाल / सेवा परवडत नाहीत हा काही याला अनेक विध पैलू आहेत हे सरकार सांगत नाही. ''जनतेला परवडणाऱ्या दरात वस्तुमाल उपलब्ध करून देण्यासाठी'' हि राज्यकर्त्यांची टॅग लाईन असते , दशकानुदशके पण अत्यावश्यक वस्तुमाल / सेवा न परवडणे हे फक्त त्या वस्तुमाल / सेवांच्या किमतीचे फंक्शन नाहीये , त्या कुटुंबाच्या मासिक आमदनी चे देखील फंक्शन आहे (पाणी , वीज , घरांचे हप्ते , अन्नधान्य , सार्वजनिक वाहतूक, शिक्षण , आरोग्य त्याच त्या शेकडो वर्षे अत्यावश्यक सदरात मोडणाऱ्या गोष्टी ; काहीही बदल झालेला नाही त्या यादीत)

मासिक १५,००० रुपये आमदनी असणाऱ्या कुटुंबाला १००० सिलेंडर न परवडणारा वाटेल पण ५०,००० रुपये मासिक आमदनी असणाऱ्या कुटुंबाला त्याची बोच जाणवणार नाही

महागाई वाढली कि आपण जनतेसाठी काहीतरी करत आहोत असे राज्यकर्ते दाखवतात, ते देखील निवडणुका तोंडावर आल्यावर,

पण कोट्यवधी ग्राहकांचे रोजगार आणि स्वयंरोजगारातून ओव्हर अ पिरियड मासिक आमदनी कशी वाढेल याबद्दल एक अक्षर काढत नाहीत हि मंडळी ; शेतीवर अवलंबून असणाऱ्यांचे / मानवी श्रम विकून पोट भरणाऱ्यांचे मग काय सरकारने गरिबांना सिलेंडर (आणि इतर अत्यावश्यक गोष्टी) फुकटात द्यायच्या का ? असले सुपारीबाज प्रतिप्रश्न कमेंटीत टाकू नयेत ; गरीब ११०० रुपये तोंडावर फेकून मारतील आणि बाजारभावाने सिलेंडर घेतील असे त्यांचे मासिक आमदनी करा कि , त्यावर हे सुपारीबाज एक अक्षर बोलणार नाहीत

वाईट याचे वाटते बहुसंख्य नगरसेवक / आमदार / खासदार / अनेक नोकरशहा स्वतः गरिबीतून आलेले असतात ; किंवा त्यांचे आईवडील तर नक्कीच; या कणाहीन व्यक्ती स्वतःच्या कटू आठवणी विसरून , मिळणाऱ्या चवन्नी / अठन्नी वर खुश आहेत.

लोकसंसद

इंडिया ' च्या बैठकीत जनतेच्या प्रश्नांवरही चर्चा व्हावी !

भारतातील प्रमुख विरोधी पक्षांच्या ' इंडिया' आघाडीची तिसरी बैठक ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर रोजी मुंबईत संपन्न होत आहे. ह्या आघाडीची पहिली बैठक पाटणा येथे तर दुसरी बंगळूर येथे पार पडली. ह्या आघाडीचे 'इंडिया ' असे नामकरण झाल्यावर सत्ताधारी भाजपप्रणित' एनडीए' आघाडीत अस्वस्थता पसरली . भाजपने दिलेल्या ' स्टार्ट अप इंडिया , स्कील इंडिया , मेक इन इंडिया' यांसारख्या योजनांमध्ये असलेल्या ' इंडिया ' शब्दाचे काय करायचे असा धसका भाजपने घेतला. याची प्रतिक्रिया म्हणून' क्विट इंडिया ' असा नारा भाजपने दिला. 'इंडिया' आघाडी ही घराणेशाहीवाल्यांची व सत्तालोलूपांची संधीसाधू आघाडी आहे अशा शब्दांत भाजपने' इंडिया' आघाडीची संभावना , बोळवण केली . पण असे असले तरी भाजपने ह्या' इंडिया ' आघाडीचा धसकाच घेतला आहे . याची परिणाम म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांनी स्वातंत्र्यदिनानिमित्त लाल किल्ल्यावरून संकेत डावलून' राजकीय भाषण ' केले. दुसरे म्हणजे २९ ऑगस्टला घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमतीमध्ये २०० रुपयांची कपात केली. दोन दिवस मुंबईत होणा-या 'इंडिया' आघाडीच्या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीच्या रणनितीवर चर्चा होईलच. त्याचबरोबर विविध राज्यांतील घटकपक्षांचे जागावाटप , निवडणुकीतील मुद्दे , किमान समान कार्यक्रम याचाही उहापोह या बैठकीत होईल. पण ज्या उद्देशाने ह्या ' इंडिया ' आघाडीची स्थापना झाली आहे तो म्हणजे सर्वसामान्य जनतेचे हित ! ह्या आघाडीतील सर्व राजकीय पक्षांनी आपल्या वैयक्तिक राजकीय आशा - आकांक्षांना मुरड घालून सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले तरच ह्या आघाडीला आगामी लोकसभा निवडणुकीत यश मिळेल! त्यामुळे मुंबईतील व त्यापुढील ' इंडिया ' च्या सर्व बैठकांत व निवडणूक प्रचारांत सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याच्या महागाई, बेरोजगारी , रस्ते , आरोग्य सुविधा , शिक्षण, जीएसटीसारखे कर, टोलनाके , पेट्रोल - डिझेलच्या वाढत्या किंमती , शेतकऱ्यांच्या आत्महत्या यांसारख्या अनेक मुद्यांवर चर्चा करुन ह्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी सर्वसामान्य जनतेला आश्वासित करुन दिलासा दिला पाहिजे.

टिळक उमाजी खाडे

व्हायरल

मुक्काम पोस्ट भोसा

२०१४ साली, जिल्हा परिषद शाळा- मुक्काम पोस्ट भोसा, येथे मनीषा केतकर या शिक्षिका म्हणून काम करत होत्या. माझे शाळेत आठवड्यातून दोन-तीन वेळा येणे जाणे व्हायचे. ग्रामीण विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा आणि त्यांना इंग्रजी शिक्षणात मदत व्हावी म्हणून मी अनेक प्रयोग करत होते. यातले काही प्रयोग मनीषा केतकर यांनी त्यांच्या शाळेत प्रत्यक्ष आमलात आणले.

एकत्र काम केल्यामुळे आमचा घनिष्ट परिचय झाला होता. पर्यावरण, जलसाक्षरता, सीड बॉल प्रशिक्षण, सामान्य ज्ञान परीक्षा, इंग्रजी शिकवण्याच्या सोप्या पद्धती या सगळ्या गोष्टींमध्ये केतकर मॅडमला प्रचंड उत्साह होता.

त्यांच्या वर्गात दोन मुस्लिम मुली होत्या. त्या मुलींची आई थोडीशी वेडसर होती. शाळेत येताना अनेक वेळा मॅडम या मुलींसाठी डब्यात खाऊ घेऊन यायच्या. महिन्यातून एक दिवस घरून येताना संपूर्ण वर्गासाठी इडली सांबार तयार करून आणायच्या.

दरवर्षी आपल्या वर्गातील काही विद्यार्थ्यांना त्या स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसवत असत. एका वर्षी ह्या दोन बहिणींपैकी एका मुस्लिम मुलीला त्यांनी स्कॉलरशिपला बसवले होते. त्यावर्षी मी माझ्या मुलाला सुद्धा स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसवले होते. त्याचा बसस्टॅन्ड जवळील एका शाळेत नंबर आला होता. मी त्याला तिथे सोडवायला गेले तेव्हा केतकर मॅडम दोन विद्यार्थ्यांना आपल्या गाडीवर घेऊन तिथे आल्या. त्यात ही मुलगी होती.

मुलगी हुशार आहे पण तिची आई वेडसर असल्यामुळे तिला परीक्षेच्या ठिकाणी आणून घालायला कोणी नव्हते.

रविवारचा दिवस असून मॅडम तिच्या घरी जाऊन त्या मुलीला घेऊन आल्या होत्या. सोबत तिचा जेवणाचा डबासुद्धा आणला होता. पहिला पेपर सुटल्यानंतर मॅडमनी तिला पोटभर जेवू घातले आणि स्वतःच्या बाटलीतील पाणी पाजले. कारण तिची काळजी घ्यायला कोणीच नव्हते.

सावित्रीबाई फुले जयंतीच्या दिवशी दरवर्षी त्या, या मुलींच्या आईला साडी नेसवायच्या. एक-दोन वर्ष त्यांनी माझ्या हाताने त्या बाईंचा सत्कार केला होता म्हणून मला ही गोष्ट कळाली.

त्या दोन्ही पोरींना स्वतःच्या मुलींचे जुने कपडे आणून देणे, थोडीफार इतर मदत करणे, खाऊ देणे या गोष्टी मॅडम मनापासून करायच्या. शाळेत गेलं की सतत या मुलींच्या भविष्याबद्दल बोलत राहायच्या.

मनीषा केतकर आता पुण्यातील म.न.पा. शाळा क्रमांक:११, जी सोमेश्वर वाडी , पुणे या शाळेत कार्यरत आहेत. तिथेही त्या त्या तन-मन-धनाने आपले काम पार पाडत असतील याची मला खात्री आहे.

शिक्षकाचा विवेक सदैव जागा असला पाहिजे. आपल्या देशाच्या सर्वसमावेशक सर्वधर्मीय परंपरांचे त्याला ज्ञान असले पाहिजे.

आजचा व्हिडिओ पाहिल्यानंतर केतकर मॅडमची प्रकर्षाने आठवण झाली.

अमृता खंडेराव

प्रेरणा

शुद्ध कारण अंतर

कठिण नारळाचें अंग । बाहेरी भीतरीचें चांग ।
तैसा करी कां विचार । शुद्ध कारण अंतर ।
वरी कांटे फणसफळा । माजि अंतरीं जिव्हाळा
मिठें रुचविलें अन्न । नये सतंत कारण ।
ऊंस बाहेरी दिसे काळा । आंत रसाचा आगळा
तुका म्हणे मोल गोडी । काय चाड वरील्या खोडी

अर्थ

नारळाचे बाहेरचे अंग हे अतिशय कठीण असते परंतू आतमधे ते खाण्यास खूप चांगले असते. या उदाहरणावरुन तुम्ही हे लक्षात घ्या की, मनुष्य बाहेरुन कसाही असला तरी चालेल परंतू त्याचे अंत:करण शुध्दच असले पाहिजे. फणस फळाला वरवर खूप काटे असतात परंतू आतमधून ते खूप गोड असते. मीठ अन्नाला चव आणते परंतू मीठेवाचून अन्न स्वतंत्र असेल तर त्याची चव लागत नाही. ऊस बाहेरुन काळा दिसतो परंतू त्याच्या आतमधे खूप चविष्ट रस असतो. तुकाराम महाराज म्हणतात, ''अंत:करणातील गोडी महत्वाची आहे वरील खोडीशी आपल्याला काय कर्तव्य आहे.''

निवडक

शनिवारी रानभाजी महोत्सव

तळा : शहरातील गणेश मंगल कार्यालय येथे शनिवार, दि.२ सप्टेंबर रोजी तालुकास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कृषी विभाग महाराष्ट्र शासनाच्या आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त तसेच एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पामार्फत पोषण महीना समारंभाचे औचित्य साधून हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा कृषी अधीक्षक उज्वला बाणखेले, तहसिलदार स्वाती पाटील, कुलदिप बोगे, चंद्रकांत रोडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

पाण्यासाठी अतिरिक्त शुल्क

पाली : पाली शहरातील नागरिकांना आता पाण्यासाठी अतिरिक्त शुल्क मोजावे लागणार आहे. नगरपंचायतीने वार्षिक पाणीपट्टी ३०० रुपयांवरून थेट १०८० रुपये वाढवली आहे. पाणीपुरवठा करण्यासाठी येणारे ५० ते ५५ लाखांचे वीजबिल व देखभाल दुरुस्ती खर्च भागविण्यासाठी पाणीपट्टी वाढवण्यात आली असली तरी नागरिकांना अजूनही अशुद्ध व गढूळ पाणीच प्यावे लागते. नळधारकाला पूर्वीपेक्षा साधारण ७८० रुपये अतिरिक्त शुल्क भरावे लागेल.

ज्वेलर्सचे दुकान फोडले

नवी मुंबई : दागिने खरेदी करण्याच्या बहाण्याने ज्वेलर्सच्या दुकानात गेलेल्या तीन बुरखाधारी महिलांनी १ लाख ९५ हजार रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या बांगड्या चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. वाशीतील मयुरा ज्वेलर्समध्ये ही चोरी झाली. दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चोरी कैद झाली असून, वाशी पोलिसांनी या तिन्ही महिलांचा शोध सुरू केला आहे.

पाच बालकामगारांची सुटका

नवी मुंबई : नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने मंगळवारी दुपारी खारघर परिसरात कार सर्व्हिस सेंटर व गॅरेजमध्ये छापे मारून पाच बालकामगारांची सुटका केली. या बालकामगारांना कमी वेतनात अतिश्रमाचे काम देऊन राबवून घेतले जात होते. त्यामुळे दोन्ही आस्थापना चालकांवर गुन्हे दाखल करून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. रफिउल्ला कलीम उल्लाह अन्सारी (३६) व मोहम्मद सुलतान मोहम्मद सलीम (३२) अशी आरोपींची नावे आहेत.

चोवीस तासांत वीजजोडणी

श्रीवर्धन : घरगुती व व्यावसायिक (वाणिज्य) वीज जोडणीसाठी कागदपत्रांसह अचूक अर्ज करणाऱ्या ग्राहकांना आता अवघ्या २४ तासांत जोडणी दिली जात आहे. 'महावितरण'चे कनिष्ठ अभियंता डी.बी. घुगे यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ग्राहकांना मीटर देऊन वीजपुरवठा सुरू करत आहेत. त्यामुळे ग्राहकांना वीज जोडणीसाठी हेलपाटे मारावे लागणार नाहीत.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१ सप्टेंबर

१) श्री. विजय तुकाराम चव्हाण
श्रीबाग, अलिबाग, १-०९-१९४८
२) श्री. प्रभाकर मोतीराम धनावडे
अलिबाग, १-०९-१९३७
३) श्रीम. मालती प्रभाकर बोंद्रे
वरसोली, १-०९-१९४०
४) श्री. अभिमन्यू नारायण कोळी
नवगाव, अलिबाग, १-०९-१९५०
५) श्रीम. देवकू अभिमन्यू कोळी
नवागव, अलिबाग, १-०९-१०४९
६) श्रीम. शरयू सुरेश गुरव
थळ, अलिबाग, १-०९-१९५५
७) श्री. हरिश्चंद्र शांताराम ठाकूर
थळ, चाळमळा, अलिबाग, १-०९-१९५४
८)श्री. बाळासाहेब सदाशिव बनसोडे
अलिबाग, १-०९-१९५७
९) श्री. अनिल हरिश्चंद्र थळे
वेश्वी, अलिबाग, १-०९-१९५९

पंचांग

१ सप्टेंबर २०२३
शुक्रवार
विक्रम संवत्- २०७९
श्रावणशके संवत्- १९४५
संवत्सर – शोभननाम
अयन- दक्षिणायन
मास- श्रावण
ऋतु- वर्षा
कृष्ण पक्ष
तिथि : द्वितीया २३:५०:३७
नक्षत्र : पूर्वाभाद्रपद १४:५५:५९
योग : धृति १३:०९:२१
करण : तैतिल १३:३२:०२
करण : गर २३:५०:३७
सूर्य : सिंह
चन्द्र : मीन०९:३६:२४
हिजरी सन् - १४४५
मुस्लिम मास - सफर
तारीख - १५
विशेष
जरा- जिवंतिका पूजन
शिवचरण महाराज पुण्यतिथी- अकोला
केशवदत्त महाराज पुण्यतिथी सोनगिरी (धुळे)

सुडोकू

5			9	1	6	8		2
		8	2				7	
1	4			8	3			5
						7		
	5	6	4		7	9	2	
		3						
3			8	5			6	7
	8				4	3		
6		4	3	7	1			8

गुरूवारच्या अंकातील कोड्याचे उत्तर

3	5	7	8	2	9	6	4	1
8	2	9	6	1	4	7	5	3
6	4	1	5	7	3	9	8	2
9	6	5	3	8	2	1	7	4
4	7	2	1	9	5	3	6	8
1	3	8	7	4	6	2	9	5
5	1	6	9	3	8	4	2	7
2	9	3	4	5	7	8	1	6
7	8	4	2	6	1	5	3	9

PRESS SERVICES OF INDIA

पहिल्याच पावसात रस्ता गायब

लाखो रुपये पाण्यात, नागरिक संतप्त; कळंब-नेरळ रस्त्यावरील डांबरी कार्पेटही विरघळली?

। नेरळ । वार्ताहर ।

कर्जत तालुक्यातील महत्त्वाचा समजला जाणारा कळंब- नेरळ- माथेरान मार्गावरील काम पावसाळ्यापूर्वी करण्यात आले होते. मात्र पहिल्याच पावसात या रस्त्यावर टाकलेला डांबरी कार्पेट पावसात वाहून गेल्याने नागरिक संताप व्यक्त करत असून अनेक वर्षांनी रस्त्याचे झालेले काम पहिल्याच पावसाळ्यात खराब झाल्याने शासनाचे लाखो रुपये पाण्यात गेले आहेत. त्यामुळे विकास पहिल्याच पावसात वाहून गेल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

कळंब- नेरळ-सुमारे १२ किलोमीटर चा रस्ता रहदारी साठी अत्यन्त महत्वाचा समजला जातो, या रस्त्याने कळंब-पोशीर-वारे परिसरातील अनेक गावे वाड्या वस्त्या नेरळ शहराला जोडले आहेत. ग्रामीण भागातून दररोज प्रवास करणारे कामगार ,व्यावसायिक, शालेय विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येत आहे. मात्र मागील अनेक वर्षांपासून या रस्त्याचे सलगपणे पूर्ण काम होत नसल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करून प्रवास करावा लागत आहे ,एक भागात रस्ता चांगला झाला की दुसऱ्या भागात खड्डे पडतात एकाच वेळी संपूर्ण रस्त्याचे काम होत नसल्याने नेरळ-कळंबदरम्यान चा प्रवास आजतागायत सुसह्य झाला नाही ,अनेक वेळा प्रवाशी नागरिकांकडून मागणी करूनही रस्त्याचे दर्जेदार काम होत नसल्याने या रस्त्यावरुन प्रवास करणाऱ्यांचा वनवास काही संपत नाही. दरम्यान, या रस्त्यावर प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी रिक्षा चालकांनी पुढाकार घेत संभाव्य धोका ओळखून या खड्ड्यात दगड माती च्या साहाय्याने भरण्याचे काम केले आहे.

'ते' डांबरी कार्पेटही उखडले

काही महिन्यांपूर्वी नेरळ सगुणाबाग येथील शेतकरी मेळाव्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आले होते. त्यासाठी बांधकाम विभागाने तातडीने नेरळपासून सगुणाबागेपर्यंत रस्ता तत्परतेने केला. एका रात्रीत दहिवली पुलावरील खड्डेही भरण्यात आले, जणूकाही मुख्यमंत्र्यांच्या स्वागतासाठी बांधकाम विभागाने 'डांबरी' कार्पेट टाकले. मात्र, पहिल्याच पावसात डांबरी कार्पेट वाहून गेल्याने रस्ता पुन्हा जैसे थे झाला आहे.

> मे महिन्यात पोशीर ते पोहीदरम्यान करोडो रुपये खर्चून जो रस्ता झाला आहे. तो सार्वजनिक बांधकाम प्रशासनाने, लोकप्रतिनिधींनी इथल्या प्रवासी नागरिकांना दाखवून द्यावा.नेमका रस्ता झालंय कुठे, आम्ही नवीन झालेला रस्ता शोधत आहोत.
> – शहनवाज पानसरे, जिल्हा सरचिटणीस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस

> या रस्त्याचा पूर्णच भाग खचून वाहतूकही बंद होऊ शकते आणि दुर्घटनाही घडत आहेत. याकडे लोकप्रतिनिधींनीही आणि बांधकाम विभागाच्या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून रस्त्याची दुरुस्ती करावी.
> – अविनाश भोईर, ग्रामस्थ कुरुंग

> रस्त्याची अवस्था पाहता आज प्रत्येक गाडीवाल्याला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याबाबतीत लक्ष देऊन आजपर्यंत करोडो रुपये खर्च झालेल्या या रस्त्याची आज ही दुरवस्था का झाली, हे तपासून पाहावे.
> – आवेश जुआरी, सामाजिक कार्यकर्ते

कर्जत-चौक रस्ता खड्ड्यात

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यातील चौक-कर्जत रस्ता खड्डेमय बनला आहे. पर्यटन तालुका म्हणून विकसित होत असलेल्या कर्जत तालुक्यात येण्यासाठी हा महत्वाचा मार्ग असल्याने हा मार्ग कायम वर्दळ असलेला मार्ग बनला आहे. दरम्यान, या एकेरी मार्गासाठी लोकप्रतिनिधींचे प्रयत्न सुरू आहेत. मात्र, हा रस्ता दुपदरी कधी होणार, याबाबतचे प्रश्नचिन्ह कायम आहे.

चौक-कर्जत रस्त्यावर काही भागात आरसिसी काँक्रिटकरण करण्यात आले असून, त्याशिवाय डांबरीकरण झालेले आहे. डांबरीकरण करण्यात आलेल्या भागात सध्या खड्ड्यांचे साम्राज आहे.२००० साली या भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आल्यानंतर आरसीसी काँक्रिटकरण किंवा डांबरीकरण करण्यात आले नाही. त्यामुळे कर्जत येथून भिसे खिंड सोडल्यानंतर या एकेरी रस्त्यावर

अनेक भागात रस्त्याच्या कडेला खड्डे पडले आहेत. त्यामुळे दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना धोका उद्भवत असतो. वावरले गावाच्या समोर नव्याने बनविण्यात आलेल्या लहान पुलावर आणि अलीकडे पलीकडे खड्डेच खड्डे पडले आहेत. तर मोरबे धरणाच्या प्रवेशद्वार येथे असलेले खड्डे आणि त्यात गतिरोधक हे वाहनचालक यांच्यासाठी धोकादायक समजले जात आहेत. तर रस्त्याच्या एका बाजूला बनलेले खड्डे ही दुचाकी चालक यांच्यासाठी त्रासदायक बनला आहे.त्यात हा रस्ता एकेरी रस्ता असल्याने वाहनचालक यांना दुहेरी रस्ता कधी बनणार, असा प्रश्न वाहनचालक उपस्थित करीत आहेत.

दरम्यान, कर्जत-चौक रस्ता काँक्रिटचा बनविण्यासाठी शासनाने तब्बल ८२ कोटींचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबत अंतिम निर्णय दिवाळीपूर्वी होण्याची शक्यता असून, २०२४ अखेर हा रस्ता मजबूत झालेला असेल, असा विश्वास आ. महेंद्र थोरवे यांनी व्यक्त केला आहे.

वावेघर रस्त्यावरील खड्डे स्वखर्चातून भरले

जगदीश पवार यांनी जपली सामाजिक बांधिलकी

। रसायनी । वार्ताहर ।

दांड-रसायनी रस्त्यावरील वावेघर थांब्यानजीकच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून दुरवस्था झाल्याने अपघातांची मालिका सुरूच आहे. येथील खड्डेमय रस्त्यावरुन वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागायचा. ही समस्या सावळे गावचे जगदीश पवार यांनी लक्षात घेतली. त्यांनी स्व-खर्चाने बुजवण्याचे काम हाती घेतले.

शेतकरी कामगार पक्षाचे गुळसुंदे विभागातील नेते आणि पनवेल पंचायत समितीचे सदस्य जगदीश पवार यांनी त्यांची स्वत:ची जेसीबी व खडी-माती टाकून रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम केले. जगदीश पवार यांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल रसायनी पंचक्रोशीतील वाहन चालकांना, विद्यार्थ्यांना, कामगारांना, रिक्षचालकांना मोठा दिलासा

मिळाला आहे. याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

यावेळी त्यांच्यासमवेत शेकापचे युवा नेते चंदर माने, युवा नेते सुहास माळी, पुरोगामी युवक संघटनेचे रसायनी विभागाचे अध्यक्ष भास्कर गाताडे, मधुकर तांडेल, सावळे गावचे युवक अध्यक्ष चेतन म्हात्रे, उपाध्यक्ष मदन मते तसेच वावेघर गावातील कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी वाहनचालक व प्रवाशांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विरोधात नाराजी व्यक्त केली.

चिरनेर येथे खारपाटील सीएनजी पंप सुरु

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर गावात पी.पी. खारपाटील कन्स्ट्रक्शन अँड कंपनीच्या माध्यमातून खारपाटील सीएनजी गॅस पंप सुरू करण्यात आला आहे. त्याचे उद्घाटन कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक पी.पी. खारपाटील यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा पनवेलचे माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, आमदार महेश बालदी तसेच पी.पी. खारपाटील यांच्या हस्ते बुधवारी करण्यात आले.

वाहनचालकांची सेवा करता यावी यासाठी चिरनेर या ग्रामीण भागात पेट्रोल पंप आणि सीएनजी गॅस पंप सुरू करण्याचे स्वप्न कंपनीचे आधारस्तंभ स्वर्गीय परशुराम धाकू खारपाटील अर्थात आबांचे हे स्वप्न होते. ते आज सत्यात उतरले असल्याचे यावेळी पी.पी. खारपाटील यांनी सांगितले. चिरनेर विभागातील जनतेला सीएनजी गॅस भरण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत होती. मात्र, ही अडचण आता खारपाटील सीएनजी गॅस पंपाच्या माध्यमातून दूर होणार असल्याचे ते म्हणाले.

या कार्यक्रमाला तहसीलदार उद्धव कदम, पोलीस आयुक्त श्री. चव्हाण, माजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. खटावकर, सिडकोचे मिलिंद म्हात्रे, उद्योजक परशुराम जितेकर, पी. डी. देशमुख, ॲड. प्रवीण ठाकूर, समीर ठाकूर, परीक्षित ठाकूर, युवराज पाटील, शिवसेना उरण तालुका प्रमुख संतोष ठाकूर, माजी सभापती भास्कर मोकल, शिवधन पतसंस्थेचे चेअरमन गणेश म्हात्रे, वर्षा खारपटील, सुनिता खारपाटील, स्नेहल पाटील, अर्चना ठाकूर, उपसभापती शुभांगी पाटील, शेकापचे सुरेश पाटील, माजी सरपंच अविनाश म्हात्रे, सामाजिक कार्यकर्ते सचिन घबाडी, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, पोलीस पाटील संजय पाटील, राष्ट्रवादीचे संतोष ठाकूर, उद्योजक घनश्याम पाटील, बबन गोंधळी, अरुण ठाकूर, करण पाटील, रमेश फोफेरकर, आर. एन. पाटील, शेकापचे दिलीप पाटील, प्रदीप पाटील, सुशांत पाटील, महानिगमचे अधिकारी तसेच अन्य मान्यवर मंडळी व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी प्रथम सीएनजी गॅस भरण्याचा मान पुरोहित संजय जुवेकर यांना प्राप्त झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितेश पंडित व राजेंद्र भगत यांनी केले.

रामावाडी येथे आरोग्य शिबीर

। नेरळ । प्रतिनिधी ।

आयुष्मान भारत डिजिटल मिशन आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातून कर्करोग, मधुमेह, हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोग आणि स्ट्रोकच्या प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत शिबीर आणि आभा हेल्थ कार्ड नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

कर्जत तालुक्यातील आंबिवली अंतर्गत असलेल्या आरोग्यवर्धिनी उपकेंद्र अंजप असून, या उपकेंद्राच्या अंतर्गत येणाऱ्या रामावाडी येथे असंसर्गजन्य रोग हृदयरोग, कॅन्सरसंबंधी तपासणी तसेच कुष्ठरोग-क्षयरोगसाठी तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आभा (आयुष्मान भारत हेल्थ अकाउंट) कार्ड नोंदणी आदी कार्यक्रम राबविले गेले. बोरिवली ग्रामपंचायतीमधील रामाची वाडी आणि परिसरातील ग्रामस्थांनी

या शिबिराचा लाभ घेतला. याप्रसंगी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रूपेश सोनावळे, आरोग्य सेवक वारघुडा, आशा सेविका मीना लोभी यांनी रुग्णांची तपासणी केली. रायगड जिल्हा आरोग्यवर्धिनी सल्लागार डॉ सागर काटे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आरोग्यवर्धिनी स्तरावर आयोजन केले होते. यावेळी जोखमीच्या रूग्णांना प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालय येथे संदर्भित करण्यात आले. तसेच रक्तदाब आणि मधुमेह असणाऱ्या रूग्णांना शासनामार्फत औषधी पुरविण्यात आली.

यावेळी शिबिरात सहभागी रुग्णांची आभा हेल्थ कार्ड बनविण्यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांना स्थानिक तरुण महेश बांगारे यांनी सहकार्य केले. दुसरीकडे सर्वांना आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत सर्वांनी भविष्यात लाभ मिळवण्यासाठी आपले आभा कार्ड नोंदणी करून काढुन घेण्याचे आरोग्य विभागामार्फत डॉ. सोनावळे यांनी केले.

शब्दकोडे क्र.२२४



आडवे शब्द : १. अटकाव करणारे, ३. 'फ्लॅटसंस्कृती'मधून गायब झालेला वास्तुचा भाग, ६. उगवत्या सूर्याचा देश, ८. जरच्या बरोबरचा शब्द, ९. दात, १०. वाट पाहणे, १२. मध्यस्थ, १४. दागदागिने, १७. दारूचा एक प्रकार, १८. यजमान, २०. अरण्य, २१. युवक, २४. ओल, बीभत्य बोलणे इ., २६. पश्चात्ताप, २७. टिंगल, २८. नवरदेव, २९. पंख, ३०. रोग पसरवणारा कीटक, ३१. लागेल असे बोलणे, ३३. स्वत:चे, ३४. लालभडक, ३६. म्हातारपणचा पगार, ३७. पर्वत, वस्तू, ३९. वक्र, ४१. घोटाळा, ४२. ओबटगोड कोटेरी फळ, ४४. मनाची ओढ, ४६. पवित्र, ४७. तागडीची एक बाजू, ४९. कहाणीतील ऐसपैस गाव, ५१. तूप लावून भाजलेली पोळी, ५३. प्रयत्न, ५५. पायी प्रवास, ५७. क्रिकेटमधील रन, ५८. पोकळच्या विरुद्ध, ५९. अर्धवर्तुळाकृती, ६२. घासातील मातीचे कण, ६४. जागृतावस्था, ६५. रोखरक्कम, ६६. हुक्की, लहर, ६७. बिनवासाचे पांढरे फूल, ६९. पैसे देण्यास असमर्थ असलेला, ७०. अंधार, ७१. अंत:करण, ७४. कलावंत, ७५. हेरलेली शिकार, ७६. व्यायाम, ७७. झाकणाचे पात्र.

उभे शब्द : १. केस, २. उद्याच्या नंतरचा दिवस, ३. दानी, दानशूर, ३अ. रक्षण करणारे-चिलखत, स्तोत्र इ., ४. गोंधळ, आवाजाची गडबड, ५. आमटीचा दाक्षिणात्य अवतार, ६. सांभाळ, ७. नट्टपट्टा, १०. सदोदित, ११. मृत्यू, १३. मजबूत, १५. आवरण, १६. दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा, १९. काम झाल्यावर आलेली मंडळी, २२. होकार, संमती, २३. उपयोग, उपभोग, २४. दुर्मिळ फायदा, २५. शेंगेवरील आवरण, २६. जन्मजात, २८. म्हातारा, ३२. तफावत, ३३. बहुतेक कार्यक्रमांत मुख्य वक्त्यांपेक्षा याचीच बडबड फार!, ३५. पालनपोषण, ३८. मासा पकडण्याचे साधन, ३९. गंध, ४०. टपाल, ४२. शर्त, ४३. अभिनेता, ४५. आवर घालणारी वादी, ४६. झाडाभोवतीचा कट्टा, ४७. याच्यावर सगळा डोलारा अवलंबून, ४८. सुरस, वेल्हाळ, ४९. मालाचे येणे-जाणे, ५०. आनंद, ५२. बारीक ताप, ५३. आख्यान, ५४. देवाचे देहधारी रूप, ५५. घागरा, ५६. भास, भ्रांती, ५७. वचक, ६०. शोध, तपास, ६१. घरोघर, ६३. छोटी लढाई, ६६. मनाचा झालेला ग्रह, ६८. पक्ष्यांचा राजा, ६९. वेशीवरचे ठिकाण, ७०. तुझे, ७२. नूतन, ७३. शेवट

शब्दकोडे क्र.२२३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.परावलंबन ५.अनुवादक ९.मध्यम ११.कानशील १२.कट १३.शबद १४.खासा १५.बाळगोपाळ १७.घार १८.हलवाई २०.नजर २२.कुल २४.मन २५.नश्वर २७.गदारोळ २८.नाट २९.मेखला ३२.रजई ३३.दशक ३४.लट ३५.पारध ३८.मेळावा ३९.पसायदान ४०.शहर ४२.खास ४४.अट ४५.वार ४७.रतल ४९.खानावळ ५०.समाधानकारक ५२.गर्व ५३.तमाम ५४.तगडा ५६.आयात ५७.क्षपणक ६१.गोदा ६२.व ६४.रंजक ६६.नजरानजर ६९.आटपाटनगर ७१.मानव ७२.याद ७४.ण ७५.सरदार ७८.सदन ७९.बा ८०.वहिवाट ८१.सनदशीर

उभे उत्तर : १.पन्हा २.लंकादहन ३.बन ४.नशीबवान ६.नुकसान ७.वाट ८.कल्लोळ ९.महीपाल १०.मर्जी १३.शर १५.बारदान १६.गोकुळ १७.घालमेल १९.ईश्वर २१.जग २३.अटक २४.मला २६.रजनीश २८.नाश ३०.खटपट ३१.वरदा ३३.दवाखाना ३५.पायजमा ३६.घनवान ३७.भारत ३८.मेख ४१.हरकत ४३.सवलत ४४.अवांतर ४६.रकाना ४८.लकडा ५०.समक्ष ५१.धामण ५५.गजानन ५६.आदानप्रदान ५८.पलटण ५९.करंगळी ६०.भाक ६१.गोरा ६३.भाट ६५.जर ६७.जवस ६८.रया ६९.आळस ७०.पावन ७१.मारवा ७३.दप्तर ७६.रस ७७.रद

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क-
८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
२२६०५५१५५ (अमित शहानंद)

- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

१. के.सौ.सुजाता सुधाकर गिजम, ६ पुण्यस्मरणार्थ , अलिबाग

नि व ड क

गव्हाण स्थानक अपूर्णच

उरण : खारकोपर मार्गावरील गव्हाण स्थानकाचे काम अद्याप अपूर्णच आहे. हे काम पूर्ण होण्यासाठी आणखी किमान सहा ते सात महिने लागण्याची शक्यता आहे. पावसाळ्यापूर्वी सुरू करण्यात आलेली या स्थानकांच्या फलाट, त्यावरील छत आदींसह इतरही कामे अद्याप सुरू आहेत. स्थानक परिसरातील वाहनतळासह अनेक कामे सुरू झालेली नाहीत. त्यामुळे रखडलेल्या या स्थानकाचे काम सुरू होण्यासाठी आणखी किती वेळ लागणार, हा मोठा प्रश्न आहे.

मोफत नेत्रतपासणी शिबीर

सोगाव : दी लाईफ फाऊंडेशन आणि शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर शुक्रवार, दि. ८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत विठ्ठल रखुमाई मंदिर हॉल, छत्रपती शिवाजी महाराज चौक, अलिबाग येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी शिलानंद इंगळे ९३२५०५४२८०, राखी राणे ८८३०९८०१६१, प्रणय ओव्हाळ ८१४९४३७३७१ यांना संपर्क साधावा.

हरिनाम सप्ताहास प्रारंभ

उरण : न्हावे गावातील गेली १५० वर्षे सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह गुरुवार, दि. ३१ ऑगस्टपासून सुरू झाला. सदर सप्ताह दरवर्षी नित्यनेमाने साजरा करण्यात येत आहे. वर्षानुवर्षांची ही परंपरा येथील तरुणांनी जपली आहे. सप्ताहाची सुरुवात रक्षाबंधन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी सुरुवात होऊन तो जमाष्टमी, दहीहंडीपर्यंत सुरू असतो. गुरुवार दि. ३१ ऑगस्ट रोजी सुरू होऊन बुधवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सप्ताहाची समाप्ती होणार आहे.

श्रावणसरी नृत्य स्पर्धा

माणगाव : राष्ट्रवादी काँग्रेस माणगाव तालुका व शहर महिला आघाडीच्यावतीने जिल्हाध्यक्षा उमा मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवार, दि. ३ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजता कुणबी भवन हॉल, माणगाव याठिकाणी श्रावणसरी नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी किशोरी हिरवे ९६३७८९१२२९, देविका पाबेकर ९८५०८०२३०९, विशाखा यादव ७७९६६८३०३७, सुविधा खैरे ९०४९७१०२१७ यांच्याशी संपर्क साधावा.

दाविलीतील तरुण बेपत्ता

रसायनी : दापिवली रसायनी येथून स्वप्निल चंद्रकांत बरवी (२६) हा दि. २५ ऑगस्ट रोजी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील इंडो कंपनीत कामाला जातो असे सांगून निघून गेला आहे. तो अद्यापही घरी परतला नसून, याबाबत स्वप्निलचे वडील चंद्रकांत बरवी यांनी रसायनी पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे. याबाबत रसायनी पोलीस ठाण्याचे वपोनि शत्रुघ्न माळी यांच्या मार्गदर्शनाखाली खाडे अधिक तपास करीत आहेत.

पुरुष मतदारांवरच उमेदवारांची मदार

। रायगड । प्रतिनिधी ।

प्रशासक कारभाराची दोन वर्षे अनुभवणाऱ्या रायगड जिल्ह्यातील मतदारांसह लोकप्रतिनिधींनादेखील निवडणुकांचे वेध लागले आहेत. जिल्ह्यातील सात विधानसभा क्षेत्रात पुरुष मतदार ११ लाख ७० हजार ८२२ तर महिला मतदारांची संख्या ११ लाख २५ हजार ४१२ इतकी आहे. जिल्ह्यातील पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या ४५ हजार ४१० इतकी कमी आहे. आगामी लोकसभा, विधानसभा, महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये आपले नवे लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी हेच मतदार मतदान करणार आहेत. पुरुष मतदारांवर उमेदवारांची मदार असणार आहे. १८ ते ५९ वयोगटात पुरुष मतदार अधिक असून, ज्येष्ठ मतदारांमध्ये महिला मतदारांची संख्या अधिक आहे.

मतदार यादीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी रायगड जिल्हा निवडणूक शाखेने तालुका निवडणूक विभाग आणि विधानसभानिहाय मतदारयाद्या तपासण्याचे काम हाती घेतले आहे. असणाऱ्या मतदारयाद्यांमध्ये दिलेल्या पत्त्यावर मतदार आढळून न आल्यास किंवा त्यांचा मृत्यू झाला असल्यास त्यांची नावे यादीतून वगळली जाणार आहेत. एक वर्षानंतर राज्यात प्रथम लोकसभा व नंतर विधानसभा निवडणूक होणार आहे. त्यापूर्वी रायगड जिल्हा परिषद, पंचायत समिती, महापालिका, नगरपालिका निवडणुकाही होणे अपेक्षित आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाकडून मतदार याद्या अद्ययावत करण्यात येत आहेत.

रायगड जिल्ह्यात ११ लाख २५ हजार ४१२ महिला मतदारांची संख्या आहे. यामध्ये १८-१९ वयातील १११ हजार ३२९ मतदार, २०-२९ वयामधील दोन लाख २ हजार १५३ मतदार, ३० ते ३९ वयामधील दोन लाख ६३ हजार ७८४ मतदार, ४०-४९ वयामधील दोन लाख २५ हजार ५३७ मतदार, ५०-५९ वयामधील एक लाख ८१ हजार २ मतदार, ६०-६९ मधील एक लाख २४ हजार ९६०, ७०-७९ मधील ७२ हजार २०८, ८० ते ८९ मधील ३४ हजार २१७, ९० ते ९९ मधील नऊ हजार ४३०, १०० ते १०९ मधील ७९० मतदार आणि ११० ते ११९ वयामधील दोन महिला मतदारांचा समावेश आहे.

शंभरी ओलांडणारे मतदार

रायगड जिल्ह्यात वयाची शंभरी ओलांडणारे १ हजार ३२२ मतदार असल्याचे मतदारयाद्यांवरून स्पष्ट झाले आहे. यामध्ये ७९२ महिला मतदारांचा समावेश आहे. यामध्ये पनवेल विधानसभा क्षेत्रात ११० मतदार, कर्जत विधानसभा क्षेत्रात ३९५ मतदार, उरण विधानसभा क्षेत्रात १२१ मतदार, पेण विधानसभा क्षेत्रात २३० मतदार, अलिबाग विधानसभा क्षेत्रात १६२ मतदार, श्रीवर्धन विधानसभा क्षेत्रात ७३ मतदार आणि महाड विधानसभा क्षेत्रातील २३१ मतदारांचा समावेश आहे.

- **रायगडात पुरुषांच्या तुलनेत महिला मतदार कमी**
- **सत्तरी ओलांडणारे एक लाख १६ हजार ६४७ महिला मतदार**
- **जिल्ह्यात ७९२ महिला मतदारांनी ओलांडली शंभरी**

ज्येष्ठांनी आपले कायदे समजावून घ्यावेत : पाटील

। श्रीवर्धन । वार्ताहर ।

ज्येष्ठ नागरिकांनी आपल्यासंबंधी वेळोवेळी होत असणारे कायदे समजावून घ्यावेत व आपले ज्ञान अद्ययावत ठेवावे, असे आवाहन महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या (फेस्कॉम) कोकण प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष श्या.गो. पाटील यांनी दि.२९ ऑगस्ट रोजी डोंबिवली येथे बोलताना केले. कोकण प्रादेशिक विभागाची वार्षिक सर्वसाधारण सभा श्री. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली डोंबिवली येथे संपन्न झाली. त्याप्रसंगी हा ते बोलत होते.

प्रारंभी माधुरी येल्लापूरकर यांनी सुमधुर स्वरांत शांतीमंत्र व प्रार्थना सादर केली. तद्नंतर अहवाल वर्षात व अलीकडील काळात दिवंगत झालेल्या व्यक्तींना श्रद्धांजली वाहण्यात आली. प्रादेशिक सचिव विलास काळे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचले व सभेने ते मंजूर केले.

कोषाध्यक्ष प्रभाकर पवार यांनी सन २२-२३ चा जमा-खर्च, २०२३-२४ साठी अंदाजपत्रक, सनदी लेखा परीक्षकांची नेमणूक व मानधन हे प्रस्ताव सभेपुढे मांडले. त्यावर विचारण्यात आलेल्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देण्यात आली. आयत्या वेळी आलेल्या विषयांवरही चर्चा करण्यात आली. मीनाताई कुलकर्णी, प्राची करमरकर, डॉ. वृंदा कौजलगीकर, पद्माकर तांबडे यांनीही सभेस मार्गदर्शन केले. यावेळी ज्येष्ठ नागरिकांना कोकण प्रादेशिक विभागाचे उपाध्यक्ष प्रा. आनंद जोशी यांनी सर्वांचे आभार मानले. माधुरी येल्लापूरकर यांच्या पसायदानाने सभेची सांगता झाली.

विकासनिधी परत जाण्याची नामुष्की

रोहा नगरपालिकेचा बेपर्वा कारभार

। रोहा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या निधीचे योग्य नियोजन न केल्याने निधी परत जाण्याची नामुष्की रोहा नगरपालिकेवर ओढवली आहे. नगरपालिकेच्या बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळेच ही वेळ आल्याचा आरोप होत आहे. धावीर मंदिराच्या सुशोभिकरणासाठी राखून ठेवलेला पाच लाख रुपयांचा निधी परत गेल्याने रोहेकर नागरिकांकडून संताप व्यक्त होत आहे.

जिल्हा नियोजन मंडळाकडून कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून दिला जातो. वेळेत नियोजन करून निधी खर्च करणे अपेक्षित असताना नगरपालिका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे २०२२-२३ या वर्षातील धावीर मंदिर सुशोभिकरणाचा पाच लाख रुपयांचा निधी शासनाकडे परत गेला आहे. सदर निधी

२०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी मंजूर होता. त्यामुळे ३१ मार्चपूर्वी 'धावीर मंदिर सुशोभिकरण करणे' कामाला प्रशासकीय मान्यता घेऊन निधीची मागणी करणे अपेक्षित होते, परंतु नगरपालिकेच्या बांधकाम विभागाने कुठलेही नियोजन न केल्याने सदर काम रद्द करण्यात आले. मंजुरीच्या आदेश पत्रात तसा स्पष्टपणे उल्लेख केलेला होता. नगरपालिका प्रशासनाच्या ही प्रशासकीय बाब लक्षातच आली नाही.

रस्त्यांच्या कामांचीही दुरवस्था

बांधकाम विभाग सुस्त असल्याने रोहा नगरपालिका हद्दीतील रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे. सांडपाण्याचा निचरा होणारी गटारे नाहीत. भुयारी गटार योजना भूमिगत झाली आहे. नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी घेणे-देणे नसलेले बांधकाम विभाग विकासकांना परवानग्या देण्यात मात्र व्यस्त आहे. परवानग्या देताना कुठलेही निकष तपासले जात नाहीत, अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत. मागील तीन महिन्यांपासून नगरपालिकेला पूर्ण वेळ मुख्याधिकारी नसल्याने नगरपालिकेचे प्रशासन निद्रिस्त अवस्थेत आहे.

- **नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन सणानंतर आता सर्वांना गोपाळकाल्याचे वेध लागले आहे. दरम्यान, पनवेलच्या कुंभार वाड्यामध्ये गोविंदाकरिता रंगीबेरंगी हंड्या रंगविण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. (छायाचित्र : राजेश डांगळ)**

सुधागड येथील माया कांबळे बेपत्ता

। पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील खवली येथील राहत्या घरातून कोणालाही काहीएक न सांगता माया सदाशिव कांबळे या कोठेतरी निघून गेली असल्याची तक्रार पाली पोलीस ठाण्यात दि.१९ ऑगस्ट रोजी दाखल करण्यात आली आहे. तपासिक अंमलदार एस.एन. गायकवाड यांच्याकडे सदर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

याबाबतची तक्रार जयवंत सदाशिव कांबळे यांनी पोलीस ठाण्यात दिली. माया कांबळे यांचे वय ६४ वर्षे असून, अंगाने सडपातळ, चेहरा उभट, हातावर माया संजय असे गोंदवलेले, अंगात फिक्कट चॉकलेटी पिवळसर रंगाची फुले असलेली सहावारी साडी, पांढरा ब्लाऊज, पायात साधी चप्पल घातले आहे. तपासिक अंमलदार एस.एन. गायकवाड ८०८७२९८०२५ तसेच पाली पोलीस ठाण्याशी ०२१४२-२४२२२३ संपर्क साधावा.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **बिल्डींग मटेरीयल दुकानात टॅलीचा अनुभव असलेली मुलगी पाहिजे. पगार : १५०००/- मो. ८००७८९३२३२/८००७९९३२३२**
- **नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.हॉटेल मॅनेजर, २.रेस्टॉरंट व किचन मॅनेजर, ३.हाऊस किपर, ४.वेटर, Reception ६.ज्यूस काउंटरसाठी माणूस. २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसॲप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५/७८७५८६६५५५**
- **अलिबाग वरसोली हम रस्त्यावर गर्गवरद सोसायटीमधील १६०० स्के.फुटचे रो हाऊस त्वरीत विकणे आहे. मो. ९४२३८९०२०१/९३२४९८३७८५**
- **AQWA FRISH वॉटर प्लांटमध्ये चार चारी टेम्पो वर ड्राईव्हर कम हेल्पर पाहिजे आकर्षक पगार मो. ८४११०२३२३२**
- **रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)**
- **अलिबाग तालुक्यातील हुशार मेहनती व स्वतःची मोटरसायकल असलेला सेल्समन हवा आहे. शिक्षण : किमान बारावी, वेतन : दहा हजार मात्र, संपर्क : ९४२२६९६२३५**
- **कॅन्टीनसाठी अनुभवी कामगार पाहिजेत. कूक ऑलराउंडर, हेल्पर, चपातीवाला, सुपरवायजर, मांडणीवाला, मोरी,अलिबाग येथे ८८५०७२३३७७/९२२४६२७२०५**
- **कामासाठी मुले पाहिजे-अलिबाग परिसरातील गरजुना १)मोबाईल विक्रीसाठी अनुभवी सेल्समन २) बाईकने डिलेवरी (लायसन्स)बंधनकारक ३)पार्ट किंवा फुल टाईम सकाळी ९ ते ९ संध्याकाळी ३ ते ८ ४)बँक ऑफिससाठी टॅलीवाली मुलगी पाहिजे. संपर्क :- ८८८८२२०२२१**

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

बसस्थानकाअभावी प्रवाशांचे हाल

। कोलाड । वार्ताहर ।

मुंबई-गोवा महामार्गावरील खांब नाक्यावरील अनेक वर्षांपासून बसस्थानक होते. परंतु, महामार्गाच्या चौपदरीकरणात ते जमीनदोस्त करण्यात आले आहे. या गोष्टीला आता १७ वर्षे झाली तरी त्याच्या जागी अद्यापही नवीन बसस्थानक बांधण्यात आले नाही. यामुळे प्रवाशांची गैरसोय होत असल्यामुळे खांब नाक्यावर नवीन बसस्थानक उभारण्याची मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

मुंबई-गोवा महामार्ग ६६ वरील खांब नाक्यावर गेली अनेक वर्षांपासून बस स्थानक जणू गायब झाला असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. यामुळे येथे बसस्थानक नसल्यमुळे महामंडळाच्या लांब

पल्ल्याच्या एसटी बसेस थांबणे सोडाच, तर रायगडमधील एसटी बसेस थांबत नसल्याने खांबकडून कोलाडकडे तसेच खांबकडून नागोठणे, पालीकडे जाणारे कॉलेज व उच्च शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक नुकसान होत आहे.

खांब नाक्यावर बाहे, देवकान्हे, धानकान्हे, चिल्हे, तळवली, नडवली, खांब, वैजिनाथ, शिरवली, मुठवली, गोवे, पुगाव, मढाळी ते बळे गरबटपर्यंत वाड्या-वस्त्या धरून २० ते २५ गावांतील विद्यार्थी, तसेच प्रवासी नागरिक मुंबईकडे अथवा महाडकडे जाण्यासाठी येत असतात; परंतु खांब नाक्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूला बसस्थानक नसल्याने येथे कोणत्याही एसटी बसेस थांबत नाही. तर, एखादी मुंबईकडून येणारी बस थांबली तर तिकीट मात्र वरसगावचे देतात. जर बस थांबली नाही, तर वरसगाववरून परत खांबकडे येण्यासाठी परत तिकीट काढावे लागत आहे. याचा संबंधितांनी गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्यासाठी गायब झालेले बसस्थानक बांधून येथे येणाऱ्या-जाणाऱ्या एसटी बसेस थांबव्या यासाठी संबंधित शासन, प्रशासन, स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांनी तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

नवीन बसस्थानक उभारण्याची खांबवासियांची मागणी

> **बसस्थानक तोडण्याला १७ वर्षे झाली, तरी येथे बस स्थानक बांधण्यात आले नाही. यामुळे प्रवाशांना उन्हपावसात रस्त्यावर उभे राहावे लागत आहे. रक्षाबंधनासाठी निघालेल्या महिलांना तीन ते चार तास गाड्यांची वाट पाहावी लागली. जर एसटी बस थांबत नसेल, तर महिलांना भाड्यात सूट देण्याला अर्थ आहे का?**
> **– अलंकार खांडेकर, सामाजिक कार्यकर्ते**

अद्याप अधिकारी फिरकलेच नाहीत

उपोषण मंडपातच उपोषणकर्त्यांचे रक्षाबंधन

चिंध्रण येथील ग्रामस्थांच्या उपोषणाचा गुरुवारी चौथा दिवस

। पनवेल । प्रतिनिधी ।

सोमवारी २८ ऑगस्ट रोजी चिंध्रण येथील ग्रामस्थांनी मुंबई ऊर्जा प्रकल्पाच्या बळजबरी उभ्या केलेल्या टॉवरविरोधात बेमुदत उपोषण सुरू करून आज चौथा दिवस उजाडला. मात्र, अद्यापही या उपोषणकर्त्यांची साधी विचारपूस करण्यासाठी तालुकास्तरावरील किंवा जिल्हास्तरावरील अधिकारी फिरकलेच नाहीत. त्यातच बुधवारी रक्षाबंधनाचा सणदेखील उपोषण करणाऱ्या ग्रामस्थांचा हा उपोषण ठिकाणीच पार पडला.

रक्षाबंधन सण साजरा करण्यासाठी बहिणी आल्या, मात्र आपले भाऊ घरातच नाहीत. ज्या भावाला गोडधोड खाऊ घालण्यासाठी बहिणी आल्या, त्या उपोषणाच्या ठिकाणीच त्यांना राखी बांधून उपाशीच ठेवून गेल्या. प्रशासनाचा नाकर्तेपणा यावेळी भावा बहिणींच्या अश्रुंमधून झळकत होता. यावेळी उपोषणकर्ते किरण कडू, सुजित पाटील, मनोज कुंभारकर, राम पाटील, विलास पाटील, मधुकर पाटील, शैलेश अरीवले, जयराम कडू, रुपेश मुंबईकर, बामा भंडारी, गणेश देशेकर, संतोष अरीवले, ताईबाई कडू, समीर पारधी यांनी उपोषणादरम्यान कोणाच्या जीवाचे काही बरे-वाईट झाले तर शासनाला जबाबदार ठरवले आहे.

याठिकाणी उपोषणाचा चौथा दिवस उजाडला तरी प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना जाग येत नाही. ग्रामस्थांच्या मागणीनुसार मुंबई ऊर्जा प्रकलपासाठी जी नियोजित जागा होती, त्याच जागेतून टॉवर नेण्यात यावेत, मात्र मुंबई ऊर्जा प्रकल्पाच्या मालकाने संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरून ग्रामस्थांच्या जागा बळकाविल्या आहेत, असा आरोपदेखील यावेळी ग्रामस्थांनी केला आहे.

उपोषणकर्त्या मुलाची प्रकृती खालावली

। पनवेल । प्रतिनिधी ।

गावठाण विस्तार आणि बळजबरी करून टॉवर उभारणाऱ्या मुंबई ऊर्जा प्रकल्पाच्या विरोधात चिंध्रण येथे ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा चौथा दिवस उजाडला. याठिकाणी उपोषणकर्त्यांमध्ये एकूण १६ ग्रामस्थांनी सहभाग घेतला असून, यामध्ये समीर पारधी या आदिवासी मुलाची गुरुवारी प्रकृती खालावली आहे.

उपोषणाच्या चौथ्या दिवशीही कोणतेही अधिकारी याठिकाणी फिरकलेच नाहीत, त्यातच उपोषणकर्त्यांमध्येदेखील आता थकवा येऊ लागला आहे. चिंध्रण ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुजित पाटील यांना थकव्यामुळे बोलताना त्रास होऊ लागला आहे. त्यामुळे प्रशासन आतातरी जागे होईल का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. प्रशासनाच्या कारभाराविरोधात सध्या उपोषणकर्त्यांमधून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या उपोषणाला सर्व स्तरातून पाठिंबा वाढत आहे.

ग्रामविकास विभाग गावची जीवनवाहिनी

गटविकास अधिकारी संदीप कराड यांचे प्रतिपादन

। रसायनी । वार्ताहर।

गावच्या सुख-दुःखात, गावच्या विकासात ग्रामविकास हा महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग असल्याने ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी आणि कर्मचारी यांचे सर्व ठिकाणी योगदान महत्त्वाचे आहे.त्यामुळे हे सर्व गावची लाईफलाईन आहेत, ही लाईफलाईन थांबता कामा नये, असे आवाहन खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी केले आहे.

१९ जुलै २०२३ रोजी इर्शाळवाडीची दुर्दैवी घटना घडली. यात ८४ जणांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. या दुर्घटनेनंतर तेथील मदत व पुनर्वसन कार्यात ग्रामविकास विभागाचा महत्त्वाचा वाटा होतो. यावेळी खालापूर तालुक्यातील ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत कर्मचारी यांनी अहोरात्र मेहनत घेतली आहे. त्यांच्या कार्याची दखल घेणे क्रमप्राप्त आहे, अशी जाणीव ग्रामसेवक संघटना डीएन १३६ यांना झाल्याने ग्रामसेवक संघटनेच्या वतीने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांचा सन्मान गटविकास अधिकारी संदीप कराड व मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी सगविअ. राजपूत, गटशिक्षण अधिकारी चोरमोळे, विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, महादेव शिंदे, ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष प्रशांत कदम, कोकण सचिव प्रमोद पाटील, रायगड कार्याध्यक्ष संतोष पवार, तालुका सचिव अजय फोफेरकर यांच्यासह ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत व पंचायत समितीचे अधिकार, कर्मचारी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-नांदाईपाडा, ता. अलिबाग येथील गट नंबर १७४, एकूण क्षेत्र ०-६३-४० हे.आर; आकार १३.३५ रू.पै. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनील गौरू पाटील रा. मु. फकीरपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख : ३०/०८/२०२३

(ॲड. संजय द. म्हात्रे)
पत्ता : श्रृती सारंग, को.ऑप.हौ.सो, ए. विंग
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राह्मण आळी
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड

GOVERNMENT OF MAHARASHTRA, HOME DEPARTMENT (PORTS & TRANSPORT)
MAHARASHTRA MARITIME BOARD
Indian Mercantile Chambers, 2nd Floor, Ramjibhai Kamani Marg, Ballard Estate, Mumbai-400 001. **Tel.:** 022-69041777, **Fax :** 022-69041740
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email : ceo.mmb@maharashtra.gov.in / ceommb@gmail.com

TENDER NOTICE

Online Tenders (E-Tender) are invited by the Maharashtra Maritime Board on Tender Information System Portal **http://maharashtra.gov.in** from suitable bidders for following work.

OPERATION & MAINTENANCE OF PARKING FACILITY AND PASSENGER JETTY AT MURUDKHORA, TAL. MURUD, DIST. RAIGAD, MAHARASHTRA

The Details can be viewed online and downloaded directly from Government of Maharashtra e-Tendering portal **http://mahatenders.gov.in** from 1st September, 2023 onwards. RFP can also be viewed on Maharashtra Maritime Board website **http://mahammb.maharashtra.gov.in**

Date : 01.09.2023
Place : Mumbai

Sd/-
Chief Executive Officer,
Maharashtra Maritime Board, Mumbai

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनअंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधीत भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधीतांना निवाडयाबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. क्र.	संचिका क्र.	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता (चौ.मी.)	वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती
ता.पनवेल, जि.रायगड								
१.	काळुंद्रे ३८	१३०/१५२ अ	११०/३क	०-६-७	४० चौ.मी.	**काळुंद्रे, भुखंड क्र.१७, सेक्टर – काळुंद्रे, क्षेत्र ४० चौ.मी.**	**मा. न्यायालयीन वारस दाखला क्र. CMA No. ३३६/११ नुसार** १) निरा धोंडू चिखलेकर २) सुनिल धोंडू चिखलेकर ३) उषा धोंडू चिखलेकर ४) रेश्मा रमेश पाटील ५) रुचिता धोंडू चिखलेकर ६) सरीता धोंडू चिखलेकर ७) समीर धोंडू चिखलेकर सह. दुय्यम निबंधक वर्ग -२,पवल ५-१७१८-२०२३, दिनांक ०१.०२.२०२३ रोजी नोंदणी केलेले हक्कसोडपत्रानुसार १) निरा धोंडू चिखलेकर २) उषा धोंडू चिखलेकर ३) रेश्मा रमेश पाटील ४) रुचिता धोंडू चिखलेकर ५) सरीता धोंडू चिखलेकर ६) समीर धोंडू चिखलेकर यांनी लिहून दिले आहे. **सुनिल धोंडू चिखलेकर** यांस हक्कसोड दिले आहे.	निरंक
ता.पनवेल, जि.रायगड								
१.	रोडपाली २३७	१३३	१+२ to १५+८० to १२९+ १४२ to १४६/ ४३७/ २९२	०-३७-४	७९९.९९ चौ.मी.	**नोड कळंबोली येथील सेक्टर क्र.२०, मधील भूखंड क्रं. ४०, क्षेत्र-७९९.९९ चौ.मी.**	**मुळ भूधारक पांडू खंडू म्हात्रे** **१) कै. महादीबाई पांडू म्हात्रे** **२) कै.नामदेव पांडू म्हात्रे** **३) कै.माया पाडू म्हात्रे (मयत) यांचे वारस** **१) गुरुनाथ पांडू म्हात्रे (मयत)यांचे वारस** २) विठाबाई पांडु म्हात्रे उर्फ विठाबाई दत्ताराम कडू ३) रामुबाई नामदेव म्हात्रे उर्फ रामु बाबूराव काकडे **४) काळुबाई माया म्हात्रे (मयत)** ५) रमेश माया म्हात्रे ६) रंजना माया म्हात्रे उर्फ रंजना बाबूराव शेळके **२) कै. गुरुनाथ पांडू म्हात्रे (मयत) वारस** १) कृष्णाबाई गुरुनाथ म्हात्रे २) शंकुराम गुरुनाथ म्हात्रे	निरंक
			१+२ to १५+८० to १२९+ १४२ to १४६/ ४३७/ ३०१	०-५४-१				
ता.पनवेल, जि.रायगड								
१.	०२ नावडे	नावडे १४५/७०	२४६/२२	०-६३-०	८५० चौ.मी.	मौजे खारघर, भुखंड क्र. १५, सेक्टर-१९-A क्षेत्र ८४९.४५ चौ.मी.	कै. बुधाजी उर्फ बुध्या हेंद्रया कोळी (मयत) व कै. कृष्णाबाई बुधाजी उर्फ बुध्या कोळी (मयत) यांचे वारस १) श्री. बळीराम बुधाजी कोळी २) श्री. अशोक बुधाजी कोळी ३) श्री. दत्तात्रेय बुधाजी कोळी ४) सौ. अरूणा जयवंत कोळी ५) सौ. नंदा वसंत पगडे	स्पे.मु.क्र.१९३/२०२३ हा दावा सिडको Lts प्रणालीचे अवलोकन केले असता दिसून येतो.सदर दावा दस्तगीर चाँद नदाफ यांनी बळीराम बुधाजी कोळी व इ यांचे विरुद्ध वादी व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेमध्ये दि.०२ एप्रिल २०१२ रोजी झालेल्या भूखंड विक्री कराराची विशेष पूर्तता करुन मिळण्यासाठी, ठरावासाठी व निरंतर ताकीद हुकूमासाठी दाखल केलेला आहे.
		नावडे ४क/ ६८	१५८/८	०-३४-६				
ता.पनवेल, जि.रायगड								
१.	**खारघर २६**	ओवे २१३	१३५/१२	०-१०-६	१०० चौ.मी.	भुखंड क्र. १५८, सेक्टर-३० खारघर क्षेत्र-१००.०० चौ.मी.	भूधारक १) **कै. शिमगीबाई चाहु म्हात्रे यांचे वारस** १.१) रजनी शिवजी भंडारी, १.२) लक्ष्मी महदु पाटील ३) कै. खकुबाई रामजी म्हात्रे यांचे वारस २.१) श्री. विश्वनाथ रामजी म्हात्रे	निरंक

अ. क्र.	संचिका क्र.	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता (चौ.मी.)	वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती
नोड- द्रोणागीरी								
१.	४९६	बोकडविरा १३०/८७	१९/९ ३७/५ ४०/१पै ११५/२ १३९/४पै १६६/८	०-४९-५	४५० चौ.मी.	द्रोणागीरी भूखंड क्र. ७०, सेक्टर- ५२ क्षेत्र- ४५० चौ.मी.	**मुळ भूधारक -वारस दाखला क्र.-९०/२०२१ अन्वये** **कै. धनाजी पांडुरंग पाटील (मयत)** **कै. सोमुबाई पांडुरंग पाटील (मयत)** **कै.सुमन पांडुरंग पाटील (मयत)** **१) श्रीमती रुपाली किशोर पाटील,** **२) श्री. ओम किशोर पाटील,** **३) श्रीमती शकुंतला देवराम म्हात्रे,** **४) श्रीमती दमयंती जाधव पाटील,** **५) श्रीमती योगिता संजय पाटील,** **६) कु. भूमिका संजय पाटील (अ.पा.क.)** **श्रीमती योगिता संजय पाटील,** **७) श्रीमती सुरेखा वसंत पाटील,** **८) श्रीमती चित्रा किशोर म्हात्रे,** **श्रीमती. चांगु ऊर्फ चांगुणाबाई मोतीराम पाटील यांच्या वतीने हक्कसोड पत्रकानुसार –** **९) श्रीमती गौरी गिरीष नाईक**	निरंक
ता. उरण, जि.रायगड								
१.	भेंडखळ ३८०	भेंडखळ १५७/८२	२४५/११ ३०८/११ २४७/३ २७७/६ २७६/६ २७५/१ ८८/३ २८६/४	०-०५-६ ०-०४-८ ०-०६-८ ०-०४-० ०-२१-५ ०-१८-० ०-२३-६ ०-०८-६	१४४० चौ.मी.	**भुखंड क्र.८३, सेक्टर ५५, क्षेत्र १४०० चौ.मी.**	**मा. न्यायालयीन वारस दाखला क्र. CMA No/१४/२०१३ नुसार** **१) श्री. सुरेश महादेव ठाकूर** **२) श्री. श्रीकांत महादेव ठाकूर** **३) श्री. प्रमोद महादेव ठाकूर** **४) श्री. उल्हास महादेव ठाकूर** **५) श्री. दिपक महादेव ठाकूर** **६) सौ. चित्रा कमळाकर पाटील** सह. दुय्यम निबंधक, उरण, यांचे कार्यालयात दस्त क्र. ६११/२०२३, दिनांक २०.०२.२०२३ रोजी नोंदणी केलेले हक्कसोडपत्रानुसार **सौ. चित्रा कमळाकर पाटील** यांनी लिहून दिले आहे.	निरंक
		भेंडखळ १५७/(२)-८३	२४९/८ २५३/१२	०-०३-५ ०-०३-८				
		भेंडखळ १६६/८३-८४	४०/१	०-३२-०				
		भेंडखळ ११२/८१	६१/१ब	०-११-४				
		भेंडखळ १२३	११०/२	०-१३-९				
ता.पनवेल, जि.रायगड								
१.	**उलवे २५४**	गव्हाण ५१८ब	३६५/८ब	०-०१-०	६०० चौ.मी.	उलवे नोड येथील भूखंड क्र. १२५C, सेक्टर-१९, क्षेत्र-५८९.९३ चौ.मी.	श्रीमती सुनंदा पांडुरंग देशमुख, श्रीमती सुनिता पुरूषोत्तम मांडे, श्री. वामन पांडुरंग देशमुख, श्री. वसंत पांडुरंग देशमुख, श्री. नितीन पांडुरंग देशमुख, श्री. काशिनाथ उर्फ गुलाबराव नारायण देशमुख, श्रीमती भिमाबाई उर्फ वैजयंता वसंत खैरे	रे.मु.क्र.८९/२००८ या दाव्यामधील दिनांक ०१.०८.२०२१ रोजीच्या मा.लोक अदालती मधील तडजोडपुरशीस नुसार १/१) श्रीमती सुनंदा पांडुरंग देशमुख, १/२) श्रीमती सुनिता पुरूषोत्तम मांडे, १/३) श्री. वामन पांडुरंग देशमुख, १/४) श्री.वसंत पांडुरंग देशमुख, १/५) श्री. नितीन पांडुरंग देशमुख, २) श्री. काशिनाथ उर्फ गुलाबराव नारायण देशमुख, ३) श्रीमती भिमाबाई उर्फ वैजंयता वसंत खैरे यांच्या नावे भुखंडाचे वाटप करण्याचे प्रस्तावित आहे.
		गव्हाण ३६७	३४४/१ ३४१/२	०-२०-६ ०-४५-०				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधीतांनी नोंद घ्यावी की, संबंधीत संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकाच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहिर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार असून अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र.१०. तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

मुख्य भूमी व भूमापन अधिकारी

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२८३/२०२३-२४

(छायाचित्र : समीर मालोदे)

या भूमीत घडतील उद्याचे विजयवीर

। अलिबाग । प्रमोद जाधव ।
सचिनमुळे लहान मुले क्रिकेट खेळू लागली, सायना नेहवालमुळे मुली हातपाय मारायला लागल्या, त्याचप्रमाणे महेश भूपती, लिएंडर पेस, रोहन बोपण्णा, सानिया मिर्झा यांच्याकडे बघत आज असंख्य मुले-मुली टेनिसकडे वळत आहेत. या सर्व खेळाडूंनी आपापली कारकीर्द गाजवली असून, देशाचा नावलौकिक वाढवला आहे. त्यांचे अनुकरण करीत तालुक्यातील बांधणच्या भूमीत उद्याचे विजयवीर घडतील, अशी आशा आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या माध्यमातून जिल्हा महिला आघाडीप्रमुख चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने बॅडमिंटन कोर्टची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानिमित्त उदयोन्मुख खेळाडू, प्रशिक्षकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. अलिबाग तालुक्यातील खेळाडूंना सरावासाठी बॅडमिंटन कोर्ट उपलब्ध नसल्याने पनवेल अथवा आरसीएफमधील क्रीडा संकुलात जाण्याची वेळ येत होती. खेळाडूंची होणारी गैरसोय चित्रलेखा पाटील यांनी दूर करण्याचा 'पण' केला होता. त्याची फलनिष्पत्ती आज झाल्यामुळे खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या कार्टमुळे खेळाडूंना नवा आशेचे किरण प्राप्त झाल्याची प्रतिक्रिया खेळाडूंनी व्यक्त केल्या.

बॅडमिंटन कोर्टमुळे उदयोन्मुख खेळाडूंमध्ये आशेचा किरण

गेल्या तीन वर्षांपासून रायफल शूटिंग या क्रीडा प्रकार खेळत आहे. आतापर्यंत राज्य पातळीवर या खेळातून कामगिरी बजावली आहे. माझे मूळ गाव कमळपाडा आहे. सध्या अलिबागमध्ये राहते. बांधण या ठिकाणी बांधण्यात आलेले बॅडमिंटन कोर्ट ही खेळाडूंसाठी एक पर्वणीच असणार आहे. या कोर्टमधून अनेक खेळाडू घडण्यास मदत होणार आहे. एका ग्रामीण भागात अशा प्रकारचे कोर्ट उभारून खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे.
– देवश्री टेमकर, कमळपाडा (खेळाडू)

गेल्या सहा वर्षांपासून थ्रो बॉल खेळ प्रकार खेळत आहे. राष्ट्रीय पातळीपर्यंत कामगिरी बजावली असून, सुवर्णपदक मिळविले आहेत. सध्या मी पनवेलध्ये एम.कॉमचे शिक्षण घेत आहे. रायगड जिल्ह्यातील वातावरण खेळासाठी पोषक आहे. याठिकाणी वेगवेगळ्या खेळासाठी अधिक चांगल्या पद्धतीने क्रीडा संकुल उभे होणे काळाची गरज आहे. बांधण येथे उभारलेले बॅडमिंटन कोर्ट खेळाडूंसाठी एक वरदान ठरणार आहे. खूप चांगले व्यासपीठ शेकापने मिळवून दिले आहे.
– अभिराज म्हात्रे, पेझारी (खेळाडू)

गेल्या अनेक वर्षांपासून बॅडमिंटन खेळ खेळत आहे. अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील रहिवासी आहे. बॅडमिंटन खेळाडूंना सराव करण्यासाठी शेकापकडून एक हक्काचे व्यासपीठ मिळाले आहे. खेळाडूंना चांगली संधी यातून उपलब्ध झाली आहे. प्रशिक्षकांच्या माध्यमातून चांगले खेळाडू तयार होणार आहेत.
– प्रसाद सिदूसरे, खेळाडू

अलिबाग तालुक्यातील आंबेपूर परिसरात बॅडमिंटन कोर्ट बांधण्यात आले आहे. या कोर्टचा खेळाडूंना चांगला फायदा होणार आहे. बॅडमिंटन कोर्टमधून असंख्य खेळाडू तयार होण्याची संधी मिळणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील हे बॅडमिंटन कोर्ट आहे. यातून अनेक खेळाडूंना व्यासपीठ मिळणार आहे.
– शुभम पाटील, प्रशिक्षक

बॅडमिंटन कोर्ट हे मोठ्या शहरामध्ये जास्त लोकसंख्या असलेल्या ठिकाणी तयार केले जाते. शेकापच्या चित्रलेखा पाटील यांनी अलिबागजवळील बांधण येथील एका लहानशा गावात ऑलिम्पिक धर्तीवर सुसज्ज असे बॅडमिंटन कोर्ट निर्माण करण्यासाठी घेतलेला धाडसी निर्णय आहे. येथील लोकांच्या हिताचा निर्णय त्यांनी घेतला आहे. पूर्वी खेळाडूंना अशा प्रकारचे व्यासपीठ नव्हते. आता हे व्यासपीठ मिळाल्याने येथील खेळाडूंना सरावासाठी उपयोगी ठरणार आहे.
– ॲड. जुनेद घट्टे, प्रशिक्षक

पिंच्याक सिलॅट स्पर्धेत नवी मुंबईतील खेळाडूंचे वर्चस्व

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

भारतीय खेळ प्राधिकरण यांच्या मान्यतेने खेलो इंडिया महिला पिंच्याक सिलॅट लीग स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशन क्राईस्ट कॅडमी स्कूल कोपरखैरणे, नवी मुंबई येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत दमदार खेळाचे प्रदर्शन करून नवी मुंबईच्या खेळाडूंनी आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांतील ५३५ खेळाडू सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेचे मप्रथम क्रमांकाचा सांघिक चषकफ २५ सुवर्ण, ५ रौप्य, १४ कांस्य अशा सर्वाधिक पदकांसह नवी मुंबई संघाने पटकावला. त्याप्रमाणे द्वितीय क्रमांकाचा सांघिक चषक ११ सुवर्ण, ९ रौप्य, १५ कांस्य पदकांसह सांगली संघाने पटकावला. तसेच तृतीय क्रमांकाचा सांघिक चषक १० सुवर्ण, ८ रौप्य, १३ कांस्यपदकांसह पुणे ग्रामीण संघाने पटकावला. या खेळाचा समावेश गोव्यामध्ये होणाऱ्या ३७ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये १४ मे २०२३ रोजी भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने केला आहे. या खेळामध्ये मागील ११ वर्षे महाराष्ट्र संघ अव्वल स्थानी आहे. या सर्व खेळाडूंचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले असून, त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

नारळफोडी स्पर्धेत विलास धाटावकर प्रथम

। रेवदंडा । वार्ताहर ।

नारळी पौर्णिमेनिमित्त पंचवीस वर्षांची परंपरा जपलेल्या रेवदंड्यातील ज्येष्ठ कार्यकर्ते सुहास घोणे आयोजित रेवदंडा-चौल ग्रामस्थ मंडळाच्या नारळ फोडी स्पर्धेत रेवदंडा येथील विलास धाटावकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय क्रमांक निखिल वारगे-स्वप्निल केळसकर-दिवेआगर, तृतीय केदार मळेकर-चौल, चतुर्थ प्रथमेश बनिया-रेवदंडा यांनी पटकाविले, तर शिस्तबद्ध संघ साई स्पोर्टस्-रेवदंडा, जास्त नारळ फोड्या संघ विलास धाटावकर-रेवदंडा, उत्कृष्ट मारेकरी-तुषार धाटावकर-रेवदंडा, नवोदित मारेकरी-प्रसाद पाटील-चौल यांची निवड करण्यात आली.

या स्पर्धेला सुहास घोणे व अध्यक्ष संदेश बेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सायकांळी चार वाजता प्रारंभ झाला. या स्पर्धेचा मैदान क्रमांक एकचा शुभारंभ शरद गोंधळी यांच्या हस्ते, तर मैदान क्रमांक दोनचा शुभारंभ शिंदे गट शिवसेना अलिबाग तालुका संघटक प्रफुल्ल मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. या स्पर्धेत एकूण ३२ संघ सहभागी झाले होते.

स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमास ठाकरे गट शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शिंदे गट शिवसेना अलिबाग तालुका संघटक प्रफुल्ल मोरे, माजी ग्रा.पं. सदस्य संदीप खोत, चौल ग्रा.पं. उपसरपंच अजित गुरव, शेकापक्ष शहर अध्यक्ष सलिम गोंडेकर, असिफ गोंडेकर, रमेश वार्डे, सुभाष शेळके, राजेंद्र नाईक, भारत वाडेकर, मंगेश मढवी, प्रमोद म्हात्रे, दिपेश पाटील, राहुल हेमंत गणपत, सिध्देश मळेकर, मुनाफ गोंडेकर आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या स्पर्धेचे सूत्रसंचालन व समालोचन सुहास घोणे यांनी केले, तसेच स्पर्धेत गुणलेखनाचे काम बंटी शेळके व मंगेश मढवी यांनी पाहिले, नारळ तपासणी यांनी केली. तर पंचाचे काम अजित पाटील, अरूण घरत, जयवंत पाटील व चंद्रकांत धाटावकर यांनी पाहिले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी सुहास घोणे व दिपेश पाटील मित्रमंडळ रेवदंडा-चौल ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

सुधागड हिल्स मॅरेथॉन स्पर्धा

पुरुषात किसन ताडवी, महिलांमध्ये प्रियांका पाईकरावची बाजी

। पाली/गोमाशी । वार्ताहर ।

सुधागड हिल्स मॅरेथॉन २०२३ पर्व २ च्या स्पर्धा अतिशय उत्साहाच्या वातावरणात रविवार, दि. २७ रोजी महागाव येथे पार पडल्या.सुधागड हिल्स मॅरेथॉनमध्ये २१ किलोमीटर, १० किलोमीटर व ५ किलोमीटर अशा तीन प्रकारात स्पर्धा होत्या. दरम्यान, पुरुषांच्या हाफ मॅरेथॉनमध्ये किसन ताडवी याने, तर महिलांमध्ये प्रियांका पाईकरावने प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत महाराष्ट्रसह राज्यातील स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धा जुहू सुपरहिट टीम तसेच विवेक विचारे, अंजली असुदानी, सुधांशू काला, अरुणा पांडे, रिचा काला, भावीन पारिख, राहुल जी टींबाडिया यांच्या माध्यमातून आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेसाठी मुख्य मार्गदर्शक गुरुमुर्ती नायक, ब्रिस्टन मिरांडा हे होते. या स्पर्धेदरम्यान साई डान्स अकॅडमी यांनी उत्कृष्ट नृत्य सादर करत स्पर्धकांची मने जिकली. तसेच सुधागड ०७ यामध्ये स्थानिक कलाकारांचा समावेश असलेल्या चित्रपटाचे अनावरण मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले.

या स्पर्धेनिमित्त सुधागड तहसीलदार उत्तम कुंभार, माजी तहसीलदार दिलीप रायन्नावार, राजेश मपारा, विष्णू पाटील, राजेंद्र राऊत, दिनेश चिले, महागाव ज्येष्ठ नागरिक दगडू पिंगळे, अनंत चोरगे, रामचंद्र सुतार यांसह गावातील महिला नवतरुण वर्ग उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश चोरगे व निलेश नाईक यांनी केले.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे, हाफ मॅरेथॉन पुरुष : खुला-किसन तडवी, रामेश्वर मुंजल, विशाल कंबिरे. तर, महिलांमध्ये प्रियंका पाईकराव, वेदिका मंडलिक, राजश्री माल्या यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकाविला. ४५ वर्षांपेक्षा कमी वयोगट पुरुष-अनंत गावकर,सिद्धेश बर्जे, रामू पारधी. ४५ वर्षांपेक्षा अधिक वयोगट : जयपाल भोयर, जॉर्ज थॉमस, उदय बोभाटे. ५ किलोमीटर पुरुष : अमोल ताम्हणकर, निमिश पावसकर, अन्वय नाडकर्णी. ५ किलोमीटर महिला : एकता सी, गौरी चव्हाण, पाऊ छान हू. १० किमी पुरुष : भविष्य कौशिक, अक्षय कुमार, अतुल बर्डे. तर, महिलांमध्ये सोनाली देसाई, साक्षी भंडारी, पद्मा कारंडे. १० किमी १४ ते ३० वर्षे पुरुष : आसिफ खान, अफ्ताफ अन्सारी, सुमित मोरे. ३० ते ४० वर्ष : अनिल कोरवी, देसराज मीना, चिंतामण गायकवाड. ४० ते ५० वर्ष : नाथा गिरनेकर, मनीलाल गावित, समीर मांजरेकर. ५० ते ६० वर्ष : रवी कळशी, आंद्रे, नीरज देसाई. ६० वर्षांवरील : पांडुरंग चौगुले, लॉन्स लॉट, संजय जाधव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकाविला.

वाडगावच्या हनुमान तालीम संघाची बाजी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

नारळी पौर्णिमेचे औचित्य साधून मांडवा समुद्रकिनारी राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा रंगल्या. अलिबाग तालुक्यातील मांडवा ग्रामस्थ आणि टाकादेवी क्रीडा मंडळ मांडवा यांच्यावतीने घेण्यात आलेल्या या कुस्ती स्पर्धेत वाडगावच्या हनुमान तालीम संघाने बाजी मारत प्रथमक क्रमांकाचे पारितोषिक मिळविले. या आखाड्याला प्रथम क्रमांकाचे चषक व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले.

रायगड जिल्ह्यातील अलिबाग, मांडवा, आंदोशीसह कोल्हापूर, पुणे, ठाणे, मुंबई, सांगली जिल्ह्यातील १५ हून अधिक आखाड्यांनी सहभाग घेतला होता. सुमारे ५०० मल्ल कुस्ती खेळण्या आले होते. दोनशेहून अधिक कुस्त्या या मैदानात रंगल्या.

संध्याकाळी सुरु झालेला कुस्तीचा थरार रात्री नऊ वाजेपर्यंत सुरुच होता. ज्या संघाचे मल्ल

अधिक विजयी झाले, त्या संघाला गुणानुसार प्रथम क्रमांकाचे पारितोषिक बक्षीस देण्याचे नियोजन केले होते. वाडगावमधील हनुमान संघाला २९ गुण मिळाल्याने या संघाला प्रथम क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. भिवंडीमधील कलानिकेतन कोन संघाला २६ गुण मिळाल्याने द्वितीय क्रमांक, तर भिवंडी येथील सापाड संघाला २३ गुण मिळाल्याने तृतीय क्रमांक देऊन सन्मानित करण्यात आले असल्याची माहिती आयोजकांनी दिली. ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी ग्रामस्थ मांडवा, टाकादेवी क्रीडा मंडळाच्या पदाधिकारी व सभासदांनी प्रचंड मेहनत घेतली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)